


डॉ. सौ. स्वप्नाली
अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ज्ञ
वेळ :
सकाळी १० ते दुपारी १
व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा,
नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# जिल्हा परिषदेत महायुतीचा डंका

## विधानसभा, महापालिका, नगरपालिकांच्या पाठोपाठ जिल्हा परिषदांमध्येही भाजपचाच वरचष्मा राहिला आहे. १२ जिल्हा परिषदांपैकी सहा जिल्ह्यांमध्ये भाजपला बहुमत अथवा सर्वाधिक जागा मिळाल्या.




| जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक २०२६ | पक्ष | भाजप | शिंदे सेना | राष्ट्रवादी अ.प. | ठाकरे सेना | राष्ट्रवादी श.प. | काँग्रेस | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद एकूण सदस्य ७३१ | २२५ | १६२ | १६५ | ४३ | २६ | ५५ | ५५ |

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

विधानसभा, महापालिका, नगरपालिकांच्या पाठोपाठ जिल्हा परिषदांमध्येही भाजपचाच वरचष्मा राहिला आहे. १२ जिल्हा परिषदांपैकी सहा जिल्ह्यांमध्ये भाजपला बहुमत अथवा सर्वाधिक जागा मिळाल्या. भाजपपाठोपाठ अजित पवारांच्या राष्ट्रवादीने दुसरा क्रमांक पटकवून शिवसेना शिंदे गटाला मागे टाकले. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये महायुतीने प्राबल्य कायम राखले आहे.

आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत असलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक निकालात भाजपने वर्चस्व कायम राखले आहे. भाजपला दोन जिल्हा परिषदांमध्ये बहुमत मिळाले असून, चार जिल्ह्यांत सर्वाधिक जागा मिळाल्या. राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाला प्रत्येकी दोन जिल्हा परिषदांमध्ये सर्वाधिक जागा मिळाल्या. काँग्रेस व शरद पवार गटाला प्रत्येकी एका जिल्हा परिषदेत सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. जिल्हा परिषदेत २२५ तर पंचायत समित्यांमध्ये ४५९ जागा जिंकून भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपला सिंधुदुर्ग आणि सोलापूर या दोन जिल्हा परिषदांमध्ये बहुमत मिळाले. सातारा, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव या चार जिल्हा परिषदांमध्ये भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या. अजित पवार यांच्या निधनानंतर लगेचच झालेल्या या निवडणुकीत सहानुभूतीचा फायदा राष्ट्रवादीला झाला आहे. पुणे जिल्हा परिषदेत ७३ पैकी ५१ जागा जिंकून राष्ट्रवादीने एकतर्फी यश मिळविले. कोल्हापूरमध्ये पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या.

विधानसभा, महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये शिंदे गट दुसऱ्या क्रमांकावर होता. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये मात्र अजित पवार गटाने दुसरा क्रमांक पटकविला आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूने निर्माण झालेल्या सहानुभूतीचा राष्ट्रवादीला राज्यभर फायदा झालेला दिसतो. काही जिल्ह्यांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याचा उभयतांना फायदा झालेला दिसतो.

जिल्हा परिषदेत भाजपला पश्चिम महाराष्ट्रातही चांगले यश मिळाले ही पक्षासाठी जमेची बाजू ठरली आहे. कारण आतापर्यंत भाजपला पश्चिम महाराष्ट्रात तेवढे यश मिळत नव्हते, पण पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात तसेच सहकाराचे प्राबल्य असलेल्या भागांमध्ये भाजपची पाळेमुळे घट्ट झाली आहेत.शिवसेना शिंदे गटाने रत्नागिरीत सत्ता जिंकून कोकणात शिवसेनेचीच ताकद असल्याचे दाखवून दिले. रत्नागिरी जिल्ह्यातील नारायण राणे यांच्या वर्चस्वाला शिंदे यांनी धक्का दिला आहे. रायगडमध्येही सर्वाधिक जागा शिंदे गटाने जिंकल्या. काँग्रेसला सर्वाधिक २३ जागा लातूर जिल्ह्यात मिळाल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यामुळे सांगली जिल्ह्यात पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या.

रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटाला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजप ही निवडणूकपूर्व युती सत्तेत येईल, असा दावा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केला. लातूरमध्ये काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी भाजप आणि अजित पवार गटाचे एकत्रित संख्याबळ अधिक होते.

### रायगडमध्ये शेकापचा भोपळा

राज्याच्या राजकारणात एकेकाळी शेकापचा मोठा प्रभाव होता. कालांतराने शेकाप हा रायगड जिल्ह्यापुरताच मर्यादित राहिला. रायगड जिल्हा परिषदेत अनेक वर्षे सत्ता भोगलेल्या शेकापला यंदा भोपळाही फोडता आला नाही. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जातो.

### महाविकास आघाडीची पिछेहाट

महापालिका व नगरपालिकांपाठोपाठ जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीची कामगिरी निराशाजनकच झाली आहे. मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसला जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये १००चा आकडा गाठता आलेला नाही. शिवसेना ठाकरे गटाची पिछेहाट झाली आहे. शरद पवार गटाची काही ठिकाणी अजित पवार गटाबरोबर आघाडी होती. तेथे त्यांचा फायदा झाला.काँग्रेसमध्ये नेत्यांनाच यशराज्यात काँग्रेसचा धुव्वा उडाला असला तरी सतेज पाटील यांच्यामुळे कोल्हापूर, अमित देशमुख यांच्यामुळे लातूर तसेच विश्वजित कदम यांच्यामुळे सांगली जिल्ह्यांमध्ये काँग्रेसला यश मिळाले. सतेज पाटील यांच्या पुढाकाराने कोल्हापूर महानगरपालिकेतही काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. लातूर महानगरपालिकेत अमित देशमुखांमुळे काँग्रेसला सत्ता मिळाली.

### कोणत्या पक्षाला कोणत्या जिल्ह्यात यश?

भाजप : सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, सिंधुदुर्ग, धाराशिव
शिवसेना शिंदे : रत्नागिरी, रायगड
राष्ट्रवादी अजित पवार : पुणे, कोल्हापूर
काँग्रेस : लातूर
राष्ट्रवादी शरद पवार :
सांगली जिल्हा परिषद
एकूण जागा : ७३१
भाजप :२२५
राष्ट्रवादी अजित पवार :१६५
शिवसेना शिंदे : १६२
काँग्रेस : ५५
शिवसेना ठाकरे : ४३
राष्ट्रवादी शरद पवार : २६
मनसे : २
अपक्ष, इतर : ४१
पंचायत समित्या
एकूण जागा : १४६२
भाजप : ४५९
राष्ट्रवादी अजित पवार : ३०६
शिवसेना शिंदे : ३०२
काँग्रेस : ९७
शिवसेना ठाकरे : ८९
राष्ट्रवादी शरद पवार : ४६
अपक्ष, इतर : ८६

### पुणे (७३)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १० |
| शिंदेसेना | ०५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ५१ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०६ |
| इतर | ०० |

### रत्नागिरी (५६)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | ०४ |
| शिंदेसेना | ४१ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०५ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०५ |
| इतर | ०१ |

### सांगली (६१)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १६ |
| शिंदेसेना | ०७ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०६ |
| राष्ट्रवादी (श.प.) | १८ |
| काँग्रेस | ११ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | ०२ |

### छत्रपती संभाजीनगर (६३)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २३ |
| शिंदेसेना | २० |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०४ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | ०१ |
| उद्धव सेना | ०९ |
| इतर | ०५ |

### कोल्हापूर (६८)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १२ |
| शिंदेसेना | ०९ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | २० |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | १४ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | १२ |

### धाराशिव (५५)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १९ |
| शिंदेसेना | १५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०६ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०३ |
| उद्धव सेना | ०७ |
| इतर | ०५ |

### सातारा (६५)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १९ |
| शिंदेसेना | १५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १८ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०० |
| इतर | ०१ |

### सिंधुदुर्ग (५०)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २७ |
| शिंदेसेना | १३ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०० |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०३ |
| इतर | ०७ |

### सोलापूर (६८)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | ३८ |
| शिंदेसेना | ०८ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ११ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०५ |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०० |
| इतर | ०६ |

### परभणी (५४)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २४ |
| शिंदेसेना | ०५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १५ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०३ |
| उद्धव सेना | ०६ |
| इतर | ०१ |

### रायगड (५९)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १५ |
| शिंदेसेना | २३ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १७ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०४ |
| इतर | ०० |


### लातूर (५९)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १५ |
| शिंदेसेना | ०१ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १२ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | २३ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | ०६ |

# अकोले तालुक्यात ३९ गावांत ग्रामसभा न झाल्याचा प्रकार उघड

## वित्त आयोगाच्या निधी खर्चावर प्रश्नचिन्ह; चौकशीची मागणी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



केंद्र आणि राज्य शासनाकडून थेट ग्रामपंचायतींच्या बँक खात्यात विकास निधी जमा केला जातो. त्यासाठी ग्रामसभांच्या माध्यमातून विकास आराखडा तयार करण्याचा उद्देश आहे. मात्र, अकोले तालुक्यातील 39 गावातील ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा झाल्या नसल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

आदिवासी तालुका म्हणून अकोले तालुका ओळखला जातो, अहिल्यानगर जिल्ह्याचे शेवटचे टोक म्हणजे अकोले तालुका आहे. सर्वात मोठी आदिवासी लोकसंख्या असून, तालुक्यात 148 ग्रामपंचायती आहेत. ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्यामधील दुवा म्हणून ग्रामपंचायत अधिकारी काम करत आहेत. दरम्यान, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 नुसार, प्रत्येक ग्रामपंचायतीला वर्षातून किमान सहा आणि त्यात महिलांच्या दोन विशेष ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. शासनाने 15 ऑगस्ट, 2 ऑक्टोबर,26 आनेवारी व 1 मे रोजी ग्रामसभा घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

मात्र, काही ग्रामपंचायतींनी कोणतीही दवंडी, सूचना किंवा जनजागृती न करता ग्रामसभा टाळल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. ग्रामसभेत आरोग्य, शिक्षण, पाणीटंचाई, स्वच्छता आणि सुरक्षेसारख्या मुद्दयांवर ग्रामस्थांना हक्काचे व्यासपीठ मिळते. पण मात्र राजूर, देवठाण यासह 39 ग्रामपंचायतींमध्ये प्रजासत्ताक दिनासारख्या राष्ट्रीय सणानिमित्त अनिवार्य असलेली ग्रामसभा घेण्यात न आल्याचे समोर आले आहे.

14 व्या व 15 व्या वित्त आयोगातील निधीच्या नियोजनात ग्रामसभा हा केंद्रबिंदू मानला जात असताना, ग्रामसभाच न झाल्यास निधी खर्चात आर्थिक अनियमितता किंवा गैरव्यवहार तर झाला नाही ना, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, अकोले तालुक्यात 108 ठिकाणी ग्रामसभा घेण्यात आल्या असून 39 गावात ग्रामसभा झाल्या नसल्याची माहिती अकोले पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बाळासाहेब गहिरे यांनी दिली.

राजुर ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभारामुळे नऊ महिन्यांपासून आठ-आठ दिवसांनी पिण्याचे पाणी येत आहे. सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे राजूरकरांचा ग्रामपंचायत प्रशासन व सदस्यांवरचा विश्वास उडाला आहे. ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराचे पावणेचार कोटी रुपयांचे कथित प्रकरणामुळे 26 जानेवारीच्या ग्रामसभेवर अघोषितपणे बहिष्कार टाकला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संतोष मुतडक यांनी सांगितल.

### ग्रामविकास अधिकारी झाले होते निलंबित

राजूर ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी राजेंद्र वर्पे यांच्याविरोधात यापूर्वी देवठाण, समशेरपूर 15 व्या वित्त आयोगातील आर्थिक अनियमिता आणि गैरवर्तन, गैरव्यवहार केल्याप्रकलणी जिल्हा परिषदेच्या सेवेतून बडतर्फ केले आहे. राजूर ग्रामपंचायतीच्या अपहार प्रकरणी संबंधित काळातील व्यवस्थापन व जिल्हा परिषद प्रशासनाच्या भूमिकेबाबत ग्रामस्थांमध्ये साशंकता आहे.

# अजित पवारांची 'राष्ट्रवादी'च पुणे जिल्ह्यात 'दादा'

## जिल्ह्यात केलेल्या कामाची आठवण ठेवून मतदारांनी अजित पवार यांच्या पक्षाला दिली साथ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर दु:खाची छाया असलेल्या पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्वाधिक जागा मिळवत पुणे जिल्ह्यात आपणच 'दादा' असल्याचे दाखवून दिले. आतापर्यंत अजित पवार यांच्या नेतृत्त्वामुळे तेच पुण्याचे 'दादा' असल्याचे अनेक निवडणुकांमध्ये दिसून आले. मात्र, आता अजित पवार नसले, तरी पुणे जिल्ह्यात केलेल्या कामाची आठवण ठेवून मतदारांनी अजित पवार यांच्या पक्षाला साथ देत आदरांजली वाहिली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी' बहुतांश ठिकाणी एकत्र होते. त्याचा या पक्षांना फायदा झाला. तसेच अजित पवार यांच्या निधनामुळे सहानुभूतीची लाट या पक्षांकडे होती. भाजप हा दुसऱ्या स्थानावर रहिला. शिवसेना (ठाकरे) गटाने शिवसेना (शिंदे) गटापेक्षा जास्त जागा मिळवित तिसरे स्थान पटकावले. काँग्रेसला मात्र एकाही जागेवर यश मिळाले नाही.

जिल्हा परिषदेच्या ७३ गट आणि पंचायत समितीचे १४६ गण आहेत. या निवडणुकीत ६८.३५ टक्के मतदान झाले. अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक झाल्याने या निवडणुकीत दु:खाचे वातावरण होते. कोणत्याही पक्षाने जाहीर सभा घेवून प्रचार केला नाही. मतदारांच्या वैयक्तिक गाठीभेटी घेवून प्रचार करण्यात आला. त्यामुळे मतदानाचे प्रमाण कमी झाले. त्यामध्ये अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्वाधिक जागा घेत पुणे जिल्ह्यावर सत्ता कायम राखली.

बारामतीत शत प्रतिशत अजित पवार

अजित पवार यांच्या निधनामुळे मतदारांमध्ये निरुत्साह होता. बारामतीत सर्वांत कमी ५४.९० टक्के मतदान झाले. गेल्या वेळी ६१ टक्के मतदान झाले होते. सर्व पक्षांनी जाहीर प्रचार न करता मतदारांना वैयक्तिक भेटण्यावर भर दिला. बारामतीमध्ये जिल्हा परिषदेचे सहा गट आणि पंचायत समितीचे १२ गण आहेत. अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने सर्व ठिकाणी उमेदवार उभे केले. भाजपने जिल्हा परिषदेत चार ठिकाणी आणि पंचायत समितीत ११ ठिकाणी उमेदवार उभे केले. दोन्ही ठिकाणी 'राष्ट्रवादी'चे उमेदवार निवडून आल्याने भाजपवर नामुष्कीची वेळ आली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळाली नसल्याने त्यांच्यावर नामष्की ओढवली. या पक्षाचे पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस तग धरून होती. आता काँग्रेसला नेतृत्त्व राहिले नसल्याने एकाही ठिकाणी यश मिळाले नाही.

पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. नगर परिषदेच्या निवडणुकीत सासवड वगळता अन्य ठिकाणी भाजपला शिरकाव करता आला नाही. तेव्हा प्रचाराला अजित पवार हे होते. या वेळच्या निवडणुकीत काँग्रेसच्या या माजी आमदारांमुळे भाजपने शिरकाव केला आहे. पुरंदर आणि भोरमध्ये भाजपला संमिश्र प्रतिसाद मिळाला.



# शेतकऱ्यांप्रती असलेली बांधिलकी विसरू नका - जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

## जलसंपदा विभागाच्या पंचम राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा समारोप : गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला सर्वसाधारण विजेतपद

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

"मैदानातील हार-जीत पेक्षा सहभाग महत्त्वाचा असतो. खेळात हार-जीत होतच असते, मात्र मनाने हारलेला माणूस आयुष्यात कधीच जिंकू शकत नाही. त्यामुळे खेळाडूवृत्ती जोपासत अपयशाने खचून न जाता जिद्दीने पुन्हा उभे राहिले पाहिजे. जलसंपदा विभागावर राज्याच्या शेतकऱ्यांची मोठी जबाबदारी असून, शेतकऱ्यांच्या प्रति असलेली ही बांधिलकी विसरू नका," असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

लोणी - शिर्डी येथे संपन्न झालेल्या जलसंपदा विभागाच्या पंचम राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या समारोप सोहळ्यास साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिकचे मुख्य अभियंता तथा स्पर्धेचे मुख्य समन्वयक प्रकाश मिसाळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमणवार, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत बोरकर, 'मेरी' नाशिकचे महासंचालक संजीव टाटू, मंत्रालयाचे मुख्य अभियंता व सहसचिव राजेंद्र काटपल्लीवार, मुख्य अभियंता



व सहसचिव प्रसाद नार्वेकर, पुणे येथील विनिर्दिष्ट प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजीव चोपडे, तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य अभियंता राजेश मोरे, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक सुनंदा जगताप, नागपूर येथील गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता जयंत गवळी, जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभागाचे मुख्य अभियंता सुदर्शन पगार, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुश्मिता विखे पाटील व शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय शेळके आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.विखे म्हणाले, पाणी हे जीवन असून जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी हीच या विभागाची खरी अनमोल 'संपदा' आहे. दैनंदिन कार्यालयीन कामकाज व नियोजनाचा ताण बाजूला सारून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेतून आपल्यातील उत्तम क्रीडापटू व कलाकाराचे दर्शन घडवले, ही बाब कौतुकास्पद आहे.

स्पर्धेतील हा उत्साह व ऊर्जा अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या दैनंदिन कामकाजातही कायम ठेवावी. पाण्याप्रमाणे प्रवाही राहून व चांगले आरोग्य राखून विभागाचे काम अधिक सक्षमपणे करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शिर्डी ही साईबाबांची पुण्यभूमी असून येथून 'श्रद्धा व सबुरी' चा संदेश मिळतो. सहकार चळवळीच्या माध्यमातून या परिसरात शिक्षण व आरोग्य क्षेत्रात मोठे कार्य उभे राहिले असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवली जात असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. अहिल्यानगर जिल्ह्याच्या कन्यांनी क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवला आहे. या 'स्त्री शक्ती' चा सन्मान व्हावा या उद्देशाने स्थानिक आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा या कार्यक्रमात विशेष गौरव करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात उपस्थित आंतरराष्ट्रीय खेळाडूंनीही आपले विचार मांडले. आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू कुमारी फिजा सय्यद यांनी "आरोग्य हीच खरी संपत्ती" असल्याचा संदेश दिला. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या कोमल वाकळे यांनी कार्यालयात कामाची निष्ठा आणि मैदानावरील उत्साह यांचा मेळ घालण्याचे आवाहन केले. तसेच, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या डॉ. शुभांगी दळवी यांनी "जल हे जीवन आहे आणि खेळ हा जीवनाचा आत्मा आहे," असे सांगत हार-जीत पेक्षा खेळातून मिळणारा आनंद महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

ही स्पर्धा प्रवरानगर व शिर्डी येथे ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेत विविध १० विभागांत सुमारे १६५० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. या तीन दिवसांच्या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी पटकाविले. स्पर्धेचे 'जलवीर' हे बोधचिन्ह सर्वांचे आकर्षण ठरले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था व शिर्डी साईबाबा संस्थान यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रास्ताविक प्रकाश मिसाळ यांनी केले. आभार अधिक्षक अभियंता बाळासाहेब शेटे मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण खोत व प्रतिभा पाटील यांनी केले.

# वडगाव सावताळ येथे ६३ केव्ही ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन

■ सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नातून ट्रान्सफॉर्मर मंजूर

**पारनेर (समर्थ गांवकरी)**



वडगाव सावताळ (ता. पारनेर) येथील वीज पुरवठा सुधारणा आणि ग्रामीण भागातील वीज समस्या कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मंजूर झालेल्या ६३ केव्ही क्षमतेच्या नवीन ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन कार्यक्रम पार पडला. भूमिपूजन सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी पो. मा. झावरे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, बाळासाहेब शिंदे, प्रसाद झावरे, राजेंद्र रोकडे, गो. या. रोकडे, कर्ण रोकडे, चेअरमन शिवाजी रोकडे, योगेश रोकडे, मिठू शिंदे सर, बाबासाहेब लोखंडचूर, संदीप खंडाळे, संदीप व्यवहारे, गणेश खंडाळे, सुभाष खंडाळे, दिनकर खंडाळे, बंडू गायकवाड, सतीश गायकवाड, प्रमोद गायकवाड, दत्ता व्यवहारे, खंडू कोळेकर, बाळू साहेब वरखडे, राजू केदार, किसन खरमाळे, किरण रांधवण, वैभव रोकडे, गणेश खरमाळे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, वडगाव सावताळ आणि परिसरातील शेतकरी बांधवांना वर्षानुवर्षे वीज खंडित होण्याचा, कमी व्होल्टेजचा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येवर मात करण्यासाठी मी महावितरण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. आज या ६३ केव्ही ट्रान्सफॉर्मरमुळे गावाला अधिक स्थिर आणि दर्जेदार वीज पुरवठा मिळेल. यामुळे शेतीसाठी पाणीउपसा, घरगुती वापर आणि लहान उद्योगांना मोठा दिलासा मिळेल. ही केवळ वीज योजना नाही, तर गावाच्या प्रगतीची आणि शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय मिळवून देण्याची सुरुवात आहे. पुढील काळातही अशा विकासकामांसाठी मी पूर्ण ताकद लावेन. उपस्थित मान्यवरांनीही सुजित झावरे पाटील यांच्या विकासकामांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. हा ट्रान्सफॉर्मर लवकरात लवकर कार्यान्वित होऊन गावाला त्याचा लाभ मिळावा.

# केंद्राची ऑनलाइन नोंदणी करावी

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

शासनाच्या नाफेडच्या वतीने तुर खरेदीसाठी ८ ह.रू प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केल्याने शेतकऱ्यांनी तुर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असल्याची माहिती नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर यांनी दिली आहे. शासनाच्या नाफेडने तुरीस हमीभाव ८ ह.रू क्विंटल दिला असल्याने शेतकऱ्यांनी नाफेडला तूर देण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी तुर या पिकाची नोंदणी २०२५-२६ डिजिटल सातबारा,आधार कार्ड,आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईल नंबर, नाफेड द्वारा खरेदी करण्यात येणाऱ्या शेतीमालाचे पेमेंट शेतकऱ्याच्या आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

# 'तौरल इंडिया' औद्योगिक भविष्याचा मैलाचा दगड

■ खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन

**सुपा : (समर्थ गांवकरी)**

अॅल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रात देशपातळीवर अग्रगण्य ठरलेल्या 'तौरल इंडिया' या उद्योगसमूहाच्या सुपा एमआयडीसी येथील अत्याधुनिक नव्या उत्पादन प्रकल्पाचे उद्‌घाटन उत्साहात पार पडले. या उद्‌घाटन कार्यक्रमास खासदार नीलेश लंके यांनी आवर्जून उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी 'अल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळख असलेले तसेच 'तौरल इंडिया' चे संस्थापक उद्योजक भरत गीते यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. खासदार नीलेश लंके यांनी यावेळी बोलताना सांगितले की, सुपा एमआयडीसीतील



'तौरल इंडिया' चा हा नवा प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. उद्योग, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक विकास या तिन्ही घटकांना एकाच वेळी चालना देणारे असे प्रकल्प जिल्ह्याच्या अर्थकारणाला बळकटी देतात. भविष्यात अहिल्यानगर जिल्हा औद्योगिकदृष्ट्या सक्षम म्हणून ओळखला जावा, यासाठी अशा मोठ्या प्रकल्पांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. या नव्या उत्पादन प्रकल्पामुळे स्थानिक युवक-युवतींसाठी मोठ्या प्रमाणात थेट व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास खासदार लंके यांनी व्यक्त केला. केवळ कारखान्यातील नोकऱ्याच नव्हे, तर वाहतूक, पुरवठा साखळी, दुरुस्ती सेवा, निवास, भोजन व्यवस्था आदी पूरक व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील स्थलांतर थांबून स्थानिक पातळीवरच रोजगार उपलब्ध होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

भरत गीते यांच्या उद्योजकीय वाटचालीचे कौतुक करताना खासदार लंके म्हणाले, "अत्यंत स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानाधारित असलेल्या अल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रात 'तौरल इंडिया' ने जागतिक दर्जाचे स्थान मिळवले आहे. सातत्य, गुणवत्ता आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या जोरावर भरत गीते यांनी उभा केलेला हा उद्योग नव्या पिढीतील उद्योजकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे."

# आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण ही काळाची गरज असून याबाबतचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना महाविद्यालयात असतानाच मिळाले तर निश्चितच अनेक विद्यार्थी या क्षेत्राकडे वळतील, यासाठी बांदोडकर महाविद्यालयाने पुढाकार घेवून विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित केले ही निश्चितच कौतुकाची बाब असल्याचे आमदार संजय केळकर यांनी येथे नमूद केले. नागरी संरक्षण संघटना तसेच ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्यामार्फत ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर महाविद्यालय व राष्ट्रीय सेवायोजन यांच्या विद्यार्थ्यांसाठी "आपत्ती व्यवस्थापन आणि नागरी संरक्षण मध्ये विद्यार्थी व नागरिकांचा सहभाग" ह्या विषयावर तीन दिवसीय जनजागृती व आपत्ती



व्यवस्थापनाचे तीन दिवसीय प्रात्यक्षिक शिबीर नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्‌घाटन विजय जाधव, उपनियंत्रक नागरी संरक्षण नवी मुंबई समूह ठाणे, यासीन तडवी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ठाणे महापालिका आणि मीनल वानखेडे उप प्राचार्या बा. ना बांदोडकर महाविद्यालय यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. तीन दिवसांत आपत्ती, आपत्ती व्यवस्थापन, प्रथमोपचार आणि आग ह्या विषयांवर मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे आपत्कालीन उचल पद्धती, कृत्रिम श्वसन पद्धती आणि आग विझवण्यासाठी वापराच्या पद्धती यांची प्रात्यक्षिके करून दाखवले ह्या कार्यात त्यांना रोहित सिंग राठोड यांनी सहकार्य केले. एकीकडे दिवसेंदिवस वाढते शहरीकरण आणि भरमसाट होणारी लोकसंख्या वाढ आणि त्यामानाने प्रशासकीय व आपत्ती निवारणासाठी असलेले तुटपुंजे मनुष्यबळ पाहता जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेणे व आपत्ती सजगता वाढवणे अतिशय गरजेचे असल्याचे ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रमुख यासीन तडवी यांनी देखील मार्गदर्शन करताना नमूद केले. नागरी संरक्षण व ठाणे आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्फत बांदोडकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवायोजन चे विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन विषयी जनजागृती तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यात वापरण्याचे साहित्य यांची माहिती आणि प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. या तीन दिवसीय शिबिरात नागरी संरक्षण संघटनेचे सहाय्यक उपनियंत्रक आननसिंग गढरी, बिमल नथवाणी उपमुख्य क्षेत्ररक्षक क्षेत्र - 1, कमलेश श्रीवास्तव उपमुख्य क्षेत्ररक्षक क्षेत्र- 3, कॅरमबिर सिंग भुर्जि उपमुख्यक्षेत्ररक्षक क्षेत्र - 4, हनुमान चौधरी विभागीय क्षेत्ररक्षक मानपाडा डोंबिवली, रोहित सिंग राठोड स्वयंसेवक नागरी संरक्षण दल यांनी सहभाग घेतला.

# आरोपींना घेतले ताब्यात


**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत गु.र.न. व कलम ११०/ २०२६ कलम ३१०( ४) भारतीय न्याय संहिता - २०१३, सहकलम ३, ४, २५ शस्त्रक्रिया कायदा फिर्यादीचे नांव व पत्ता अर्जुन केशव मुंडे वय ४३ वर्ष, व्यवसाय पोहेकॉ/ २५ ९० पो.स्टे. नांदेड ग्रामीण पोलीस यांना माहिती प्राप्त झाली गोपनीय माहितीव्दारे गुन्हा घडला तारीख वेळ व ठीकाण गुन्हा दाखल तारीख व वेळ दिनांक ९ फेब्रुवारी रोजी वेळ १ .२५ वाजता पांगरी शिवारातील कॅनालच्या बाजुस छोटा पुलाजवळ, नांदेड दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी ०४.५९ वाजत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक नांदेड अबिनाश कुमार, अर्चना पाटिल, अप्पर पोलीस अधीक्षक भोकर सुरज गुरव अप्पर पोलिस अधीक्षक नांदेड प्रशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग इतवारा, नांदेड गुन्हा उघडकीस आणणारे.

# सिद्ध गोरक्षनाथ मंदिर पायी दिंडीचे ११ फेबु. ला प्रस्थान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ॐ शिव सिध्द चैतन्य श्री गोरक्षनाथाच्या आशीर्वादाने सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवर्य बबन(तात्या) काटकर यांच्या मार्गदर्शना खाली महाशिवरात्री निम्मित सिध्द गोरक्षनाथ मंदिर,देऊळगाव गलांडे,ता श्रीगोंदा ते श्री क्षेत्र गोरक्षनाथगड (मांजरसुंभा), तालुका नगर पायी दिंडी सोहळा जाणार आहे. दि. ११ फेबुवारीला गोरक्षनाथ मंदिर, देऊळगाव गलांडे येथून दिंडी निघणारा आहे,दिंडीत गुरुवर्य बबन (तात्या) काटकर यांच्यासह सुमारे ३०० च्यावर नाथभक्त सहभागी होणार असून यामध्ये किर्तनकार दत्तात्रय महाराज ढोरजकर,केशव महाराज वाबर ,राजाराम महाराज साठे,सुभाष महाराज आळेकर, विद्याताई रेपाळे महाराज , पखवाज वादक माऊली महाराज सौताडे व श्रीनिवास महाराज राजगुरु तर देऊळगाव



गलांडे, लाडगाव, भानगाव, वडगाव, चिंचोली गुरव,मांडवगण फराटा, नागरगाव भजनी मंडळ हे भजनी मंडळ सहभागी होणार आहेत. दिंडी निघाल्यावर गोरक्षनाथ मंदिर, खांडगाव, महाडूळवाडी ला मुक्काम करण्यात येणार असून. दुसऱ्या दिवशी सिद्धेश्वरमंदिर मांडवगण, अंबिलवाडी, वाटेफळ येथे मुक्काम तर तिसऱ्या दिवशी वाकोडी फाटा,तुकडु ओढा येथे मुक्काम तर ४ थ्या दिवशी दरेवाडी हुन दिंडी नगरला येणार असून ,वसंत टेकडी, आशीर्वाद लोण ,नगर येथे थांबणार आहे,यावेळी नगर शहरातील भाविक मोठ्या संख्नेने उपस्थित राहतात,तर मुक्काम शेंडी येथील दत्त मंदिरात होणार आहे ,दिंडीत भाविक गोरक्षनाथांचा जयघोष करत नाथांची गाणे म्हणतात. महाशिवरात्रीला दि. १५ फेबुवारीला पिंपळगाव माळवी मार्गे पायी दिंडी गोरक्षनाथ गडावर जाणार आहे, महाशिवरात्रीला पूजा अभिषेक गडावर गुरुवर्य बबन(तात्या) काटकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दिंडीचे नियोजन सर्व सिद्ध गोरक्षनाथ सेवक व भक्त परिवार यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी संपर्क विकास काटकर मो.7350195858 यांच्याशी करावा व सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.असे आवाहन करण्यात आले आहे.

# एसटीच्या नव्या बसचे नाव आता होणार 'राजमाता जिजाऊ'




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

एसटीच्या राज्यभरातील गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ताफ्यात ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बस दाखल होणार आहेत. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत या बसला 'राजमाता जिजाऊ' असे नाव देण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे.गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ताफ्यात ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून,भगव्या आणि पांढऱ्या शुभ्र रंगसंगतीत सजलेल्या असणार आहेत.

# श्री. संत गजानन महाराजांचा प्रकटदिन उत्साहात साजरा

## 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने कर्जत परिसर दुमदुमले

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

श्री.संत गजानन महाराज यांचा प्रकट दिन व पालखी सोहळा कर्जत शहरासह तालुक्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले भक्तांच्या कल्याणासाठी अवतरलेले करुणामूर्ती, दयासागर, योगिराज श्री.संत गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त सदगुरु उद्योग समूहाच्या वतीने कर्जत येथे भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संतश्रेष्ठ श्री. गजानन महाराजांच्या जयघोषाने कर्जत शहरासह परिसर दुमदुमून गेला. यानिमित्ताने संत गजानन महाराज व सदगुरू गोदड महाराज या दोन महान संतांच्या भेटीचा अनोखा व ऐतिहासिक सोहळा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला. कर्जत येथील सदगुरू उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शंकर नेवसे व उघोग समूहाच्या अध्यक्षा कल्याणीताई नेवसे यांच्या पुढाकारातून मागील २२ वर्षांपासून संत गजानन महाराजांचा प्रकट दिन विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी साजरा केला जात आहे. यावेळी संत गजानन महाराजांच्या पादुका या सदगुरू गोदड महाराजांच्या दर्शनासाठी कर्जतला आणण्यात आल्या. दोन संतांच्या भेटीचा हा अदभूत सोहळा भाविकांसाठी भावनिक क्षण ठरला आहे. सालाबादप्रामाणे या वर्षीही श्री.संत गजानन महाराज प्रकट दिन व पालखी सोहळा सदगुरू उद्योग समूहाच्या वतीने आयोजित करण्यात आला. सदगुरू उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शंकरराव नेवसे व कुटुंबिय यांनी गजानन महाराजांचे मंदिर बांधलेले आहे. प्रकट दिनानिमित्त महाराजांच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली होती. रविवारी दि.८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता डॉ.शंकरराव नेवसे सपत्नीक, सहकुटुंब यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक करण्यात आला. नंतर मंदिरापासून प्रकट दिनाचे औचित्य साधून श्रींची पालखी मिरवणूक कर्जत शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या लक्षवेधी मिरवणुकीत ढोल पथक, पताका, झांज, लेझिम, वारकरी संप्रदाय, नृत्य टाळ मृदुंगाच्या व फुगडीच्या



तालावर भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी शहरातील मार्गावरून मिरवणूक जात असताना 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने कर्जतनगरी दुमदुमून गेली होती. दरम्यान मंदिरात सकाळी १० ते १ वाजेपर्यंत गोदड महाराज भजनी मंडळांचा भजनाचा कार्यक्रम सुरू होता. विविध भागातील आलेल्या भाविकांनी पालीखीचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे येथील संत गजानन महाराज मंदिरात श्रींच्या मूर्तीवर पुष्पवृष्टी करून नेवसे कुटुंबियांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

सकाळपासूनच मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी दिसत होती.

तसेच सदगुरू मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट कुळधरण रोड कर्जत याठिकाणी नेवसे यांच्या वतीने कर्जत व पंचक्रोशीतील सर्व भाविक व नागरिकांसाठी शिंपी आमटी व चपाती महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास महाराष्ट्राचे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व खासदार निलेश लंके यांनी सदिच्छा भेट देत मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

सदरील कार्यक्रमास सदगुरू उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शंकरराव नेवसे, अध्यक्षा सौ. कल्याणीताई नेवसे, डॉ.सुरेश नेवसे, कैलास खेडकर, आदित्य खेडकर, सिद्धांतशेठ नेवसे, प्रतिक्षाताई नेवसे व परिवार, राजेंद्र गोरे, सखाराम राजळे, रवीकिरण थोरात, डॉ.रामदास बिटे तसेच सदगुरू कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व सदगुरू उद्योग समूहाच्या सर्व कर्मचाऱ्यांसह हजारो भाविक उपस्थित होते.

# 'लाडका पत्रकार' योजना सुरू करा : डॉ. विश्वासराव आरोटे

**निघोज : (समर्थ गांवकरी)**

पत्रकारांकडेही मतांचे गठ्ठे आहेत. पत्रकारांमध्ये राजकारण फिरवण्याची, तसेच सत्ता बदल घडवून आणण्याची ताकद आहे. त्यामुळे शासनाने 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ' योजनेप्रमाणेच 'लाडका पत्रकार' योजना सुरू करावी, असे ठाम प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हास्तरीय पत्रकार अधिवेशन निघोज येथील मळगंगा देवस्थानच्या सभागृहात अत्यंत उत्साहात व थाटामाटात संपन्न झाले. या अधिवेशनात पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

यावेळी व्यासपीठावर आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, राष्ट्र सह्याद्रीचे संपादक श्री शिवाजीराव शिर्के, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष श्री वसंतराव कवाद, उपाध्यक्ष श्री अमृता रसाळ, शिवसेना जिल्हाध्यक्ष डॉ. शिरोळे, निघोज माजी सरपंच टकारामजी लंके, कन्हैया उद्योग समूहाचे मच्छिंद्र लंके, राष्ट्रवादी काँग्रेस नेते श्री सोमनाथ वरखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.







**अहिल्यानगर (निघोज) येथे जिल्हास्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न !**

मार्गदर्शन करताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार करतात. मात्र स्वतः पत्रकार अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित राहतात. त्यामुळे पत्रकारांसाठी स्वतंत्र योजना राबवून त्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता देणे अत्यंत आवश्यक आहे.

या अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार व गेली ४० वर्षे पत्रकारितेत कार्यरत असलेले निघोज येथील श्री दत्ताजी उणवणे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच कन्हैया उद्योग समूहामार्फत पत्रकार श्री शेरकर व श्री अनिल चौधरी यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवव्याख्याते श्री कवाद यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन श्री भास्कर कवाद यांनी मानले. हे अधिवेशन पत्रकारांमध्ये नवी ऊर्जा व एकजूट निर्माण करणारे ठरले.

## शिवाजी नगर अंडरब्रिज प्रश्नावर माजी नगराध्यक्ष दीपक नेम्मानिवार आक्रमक; अतिक्रमण हटविण्यासह आंदोलनाचा इशारा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शहरातील शिवाजी नगर परिसरात रेल्वे प्रशासनाने तयार केलेला अंडरब्रिज नागरिकांसाठी सोयीचा ठरण्याऐवजी सध्या मोठ्या समस्येचे केंद्र ठरत असून या प्रश्नावर माजी नगराध्यक्ष दीपक नेम्मानिवार यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. अंडरब्रिज परिसरात रस्त्याचे अपूर्ण काम, धुळीचे साम्राज्य तसेच वाढलेले अतिक्रमण यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिवाजी नगर अंडरब्रिज मार्गावर सुमारे १०० मीटर अंतरावर रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण किंवा डांबरीकरण व्यवस्थित झालेले नसल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. या



धुळीमुळे दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच पादचारी यांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार, डोळ्यांत जळजळ, ॲलर्जी यांसारख्या आजारांची समस्या वाढण्याची भीती व्यक्त होत असून धुळीमुळे अपघात होण्याची शक्यता देखील वाढली आहे. यासोबतच अंडरब्रिज परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढले असून रस्त्याच्या कडेला पान टपऱ्या, लहान दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली आहेत. या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांना सुरक्षितपणे प्रवास करणे कठीण झाले आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात देखील अतिक्रमण झाल्याने या ऐतिहासिक व सन्मानाच्या स्थळाचे सौंदर्य बाधित होत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर माजी नगराध्यक्ष दीपक नेम्मानिवार यांनी रेल्वे प्रशासन व नगर परिषद प्रशासनाकडे अंडरब्रिज परिसरातील रस्त्यावर आणखी एक सिमेंट काँक्रीटचा थर टाकून योग्य प्रकारे क्युरिंग करावे अथवा दर्जेदार डांबरीकरण करावे, अशी मागणी केली आहे.

## अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौजे जाहुर येथे प्रतिवर्षाप्रमाणे महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे दि १०फेब्रुवारी ते १७फेब्रुवारी या कालावधीत जाहुर येथील सिध्देश्वर महादेव मंदीरात सपंन्न होणार आहे पहाटे४ ते६काकडा आरती, सकाळी ८ते १०शिवलीलाअमृत पारायण, सकाळी १०ते १२गाथा भजन , दुपारी २ते ५ यावेळेत श्री.ह.भ.प.गणेश महाराज गुट्टे यांच्या वाणीतुन शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सांयकाळी ६ते ७ हरीपाठ ,रात्री ९ते११हरिकिर्तन रात्री ११ते ४ हरीजागर होणार आहे. १० फेब्रुवारी रोजी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज राजुरकर ,११फेब्रुवारी रोजी ह.भ.प.एकनाथ महाराज पाळेकर ,१२फेब्रुवारी रोजी ह.भ.प.मधुकर महाराज सायाळकर ,१३फेब्रुवारी रोजी ह.भ.प.शब्दप्रभु नरेंद्र महाराज मालेगावकर,१४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.मनोहर महाराज आळंदीकर,१५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. गणेश महाराज आडुळकर, १६फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजता अग्णीकुंड होईल.

## अकोले तालुका पंचायत समितीच्या महिलांची नेत्रदीपक कामगिरी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ मध्ये पंचायत समिती अकोले च्या महिलानी नेत्रदीपक कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफीवर नाव कोरले आहे.

अहिल्यानगर येथे माऊली सांस्कृतिक भवन मध्ये आयोजित कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या शुभहस्ते चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात आली. पंचायत समिती अकोलेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. जिल्हास्तरीय स्पर्धेतील सामूहिक नृत्य प्रकारात प्राजक्ता मोटे, माधवी




गोरे, सुनीता वलटे, स्मिता धनवटे, समता कराळे, पौर्णिमा दारोळे, विस्तार अधिकारी सविता कचरे, कृषी अधिकारी रत्नमाला शिंदे व सुमन खतोडे यांनी "शिवरायांची युगत" या कार्यक्रमात आपली कला सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्राजक्ता मोटे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. क्रीडा प्रकारांत महिला बास्केटबॉल संघाने प्रथम क्रमांक मिळवत संघभावना व कौशल्याचे उत्कृष्ट दर्शन घडवले. टेबल टेनिस एकेरी स्पर्धेत स्मिता धनवटे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर टेबल टेनिस दुहेरी स्पर्धेत स्मिता धनवटे व माधवी गोरे यांनी प्रथम क्रमांक मिळवून यशाची पुनरावृत्ती केली. १०० मीटर धावणे प्रकारात समता कराळे यांनी द्वितीय स्थान मिळवले, तर बॅडमिंटन दुहेरी स्पर्धेत सुनीता वलटे व स्मिता धनवटे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. विजेत्या स्पर्धकांचे गटविकास अधिकारी अमर माने, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी विशेष कौतुक केले आहे. महिला शिक्षकांनी केवळ अध्यापनातच नव्हे तर कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवला असल्याचे गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी काढले. या यशामुळे जिल्हा परिषदेतील महिला शिक्षकांचे मनोबल उंचावले असून त्यांची ही कामगिरी इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातील स्टेजवरील सादरीकरण पाहून मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी स्वतः उभे राहून टाळ्यांच्या गजरात महिला शिक्षकांचे कौतुक करताना दिसले.

## मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशीलतेने पळसकर कुटंबीय भारावले

- 98 वर्षांचे बापुराव पळसकर यांच्या तब्येतीची विचारपूस

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः च्या व्यस्त दौऱ्यातुन वेळ काढुन आपले विशेष कार्य अधिकारी देवराम पळसकर यांच्या पारनेर तालुक्यातील सुपा या गावातील घरी भेट देऊन त्यांचे 98 वर्षीय वडीलांच्य तब्येतीची विचारपूस करून कुटुंबातील सदस्यांन बरोबर मनमोकळा संवाद साधला. आपल्या सहकाऱ्यांना बदल असलेली मानवी संवेदनशीलतेचे दर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घडवले. पारनेर तालुक्यातील पळवे बुद्रुक या छोट्याशा दुष्काळी गावातून पुढे आलेले व गेल्या अकरा वर्षांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून



देवराम पळसकर हे कार्यरत आहेत. रविवारी सुपा एमआयडीसी येथे एका कंपनीच्या उद्घाटन करीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. याचवेळी त्यांनी आपल्या व्यस्त दौऱ्यातुन आपले विशेष कार्य अधिकारी देवराम पळसकर यांच्या सुपा येथील निवासस्थानी जाऊन पळसकर यांचे वयोवृद्ध वडील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. वडीलांकडे कोण लक्ष देत आहे, वयोवृद्ध व्यक्ती ची कशी काळजी घ्यावी अशा काही सुचना आपुलकीनेही दिल्या. पळसकर यांच्या कुटुंबातील रेखा पळसकर,कल्पना पळसकर,पूजा पळसकर,कविता पळसकर,मीना पळसकर छाया पवार,राणी गोरे ,निशिकांत पळसकर किरण पळसकर,कैलास पळसकर,विलास पळसकर अनिकेत पवार ,संकेत गोरे,निखिल पवार,प्रवीण मापरे,संतोष रोकडे यासह सर्व लहान, मोठ्या व्यक्ती बरोबर मनमोकळा संवाद ही साधला. देवराम आमचा कुटुंब चा घटक आहे असेही कौतुक कुटुंबाला सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या या संवेदनशीलतेने उपस्थित ही भारावले.यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषद सभापती राम शिंदे,खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, विक्रमसिंह पाचपुते, सुरेश धस, महंत नामदेव शास्त्री,भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, महीला अध्यक्षा अश्विनी थोरात,सुनील थोरात,मंडल सरचिटणीस कल्याण थोरात, सोनाली सालके आदी उपस्थित होते.

## अखंड हरीनाम सप्ताह व भव्य महाप्रसादाचे आयोजन

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या नावलौकिक असलेल्या व परिसरातील सर्व सदभक्तांना ,पवित्र महाशिवरात्री निमित्त प्रतीवर्षी प्रमाणे याही वर्षी दिनांक 11/02/2026 ते 18/02/2026 दरम्यान काळात शिवलीला अमृत गाथा पारायण,विठ्ठल-रुख्मिणी मंदिर कलशारोहन वर्धापन दिन व अखंड हरीनाम साप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे.हा भव्यदिव्य धार्मिक सोहळा वैकुंठवासी बाबागुरु महाराज लालवंडीकर आणी देवस्थानचे मुख्य पुजारी भागवत अप्पा स्वामी यांच्या मार्गदर्शनातून आणी गावातील समस्त ग्रामस्थांच्या सहकार्यातुन 65 वर्षापुर्वीपासूनचा सुरु असलेला सोहळा आजतागायत चालू आहे.

## तामसा पोलिसांनी केली 'मार्च एंडिंग'ची तयारी

- तामसा पोलीस एक्शन मोडवर ?
- गुटखा, पान मसाला च्या गोदमावर तामसा पोलिसांची ची कारवाई
- खोदा पहाड निकली चुहीया

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



तामसा परिसरात गुटखा माफिया ने उच्छाद मांडला असून खुलेआम गुटखा विक्री सुरु होती पण "देर आये दुरुस्त आये" त्या पाऊलावर तामसा पोलिसांनी शेताच्या आखाड्यावर तंबाखू जन्य पदार्थ साठवून ठेवलेल्या गुटखा, पान मसाला आणि गुटखा विक्री साठी स्कर्पिओ गाडीसह ६ लाख ४० हजार ५८० रुपये च्या मुद्देमाल जप्त केला .तामसा परिसरात कोपरा गावी युनूस सादिक शेख यांच्या शेताच्या आखाड्यावर विक्री च्या उद्देशाने साठवून ठेवलेल्या व स्कार्पिओ गाडी क्र.MH २५R २८६४ या गाडीत विक्री साठी घेऊन जाण्यासाठी तयारीत असलेल्या आरोपी मालक समीर खान आयाज खान पठाण रा. तामसा ला तामसा पोलीस च्या सपोनि शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि बालाजी नरवटे, सपोउनि अशोक सिंगणवाड,पोहेको शाम नागरगोजे,चापोको कदम यांनी गुपित माहिती च्या आधारे दिनांक ९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ४ च्या सुमारास अचानक छापा मारून १ लाख ४० हजार रुपये चा राजनिवास, मुसाफिर कंपनी च्या गुटखा पानमसाला सह स्कार्पिओ गाडी अंदाजे किंमत ५ लाख असं एकूण ६, ४० ५८०₹ मुद्देमाल जप्त करून राज्यशासन च्या प्रतिबंधित तंबाखू जन्यपदार्थ च्या विविध कलमसह तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यात आला.@तामसा पोलिसांनी केलेली कारवाई मार्च एंडिंग च्या नावाखाली की पुढील कारवाई अशीच चालू राहणार असं दबक्या आवाजात चर्चा समोर येत आहे, पोलिसांनी केलेला कारवाई च्या "खोदा पहाड निकली चुहीया "प्रमाणे १लाख ४० हजाराचा गुटखा सादया पानटपरी वर आढालते एका आखड्यास्वरूपात गोदमावर छापा मारीत नुसता एवढ्या कमीप्रमाणात गुटखा जप्त होते..

## अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथाज्ञानयज्ञ

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील कामठा (बु) येथे भव्य अखंड हरिनाम सप्हाह व ज्ञानेश्वरी पारायण श्रीमद् भागवत कथा सोहळा दि.११ फेब्रुवारी रोजी बुधवारी सुरुवात होत असून. दि १८ रोजी बुधवारी सकाळी महाराष्ट्र भूषण ह.भ.प.श्री अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने समारोप होणार आहे.

दररोज काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद भागवत कथा, हरिपाठ, धूपआरती, किर्तन, हरी जागरण होणार आहे. दररोज रात्री व सकाळी अन्नदात्याकडून अन्नदान होणार आहे. दररोज रात्री भगवान महाराज लहानणकर, बापूरावजी महाराज, सोपान महाराज आहेरवाडीकर, सचिन महाराज लावणीकर, राम महाराज सुगावकर, भगवान महाराज



शेंद्रेकर(परभणी), मधुकर महाराज सायाळकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दि. १७ रोजी पालखीची मिरवणूक गावातून निघणार आहे इंद्रपालसिंघ दौलत सिंघ कामठेकर व सुरज जयप्रकाश कामठेकर यांच्या महाप्रसादाने सांगता होणार आहे.

## एकनाथ शिंदेंचा वाढदिवस पारनेरमध्ये सामाजिक उपक्रमांनी साजरा

**सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून शाळांमध्ये प्रिंटर व टिफिन बॅग वाटप**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस पारनेर तालुक्यात सामाजिक बांधिलकी आणि जनकल्याणाच्या भावनेने साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध शाळांमध्ये उपयुक्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

डिकसळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून प्रिंटरचे वाटप करण्यात आले. यामुळे शाळेतील प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होणार असून



डिजिटल शिक्षणाला चालना मिळेल. या कार्यक्रमाला मा. सरपंच भाऊसाहेब चौधरी, मा. सरपंच शरद काकडे, शिक्षिका ज्योती आंबे, शेळके मॅडम, संदीप कपाळे, स्वप्निल राहिंज, भगवानराव शिंदे, मच्छिंद्र शिंदे, स्वप्निल काकडे, अजित काकडे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच वडगाव सावताळ येथील मेहेरबाबा माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले. यामुळे मुलांना शाळेत नियमित येण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन शिवाजी रोकडे, खजिनदार राजेंद्र रोकडे, संदीप व्यवहारे, गणेश खंडाळे, विकास शिंदे, मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते.

सुजित झावरे पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या विकासाच्या आणि लोककल्याणाच्या विचारसरणीला अनुसरून पारनेर तालुक्यातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने काम करत असल्याचे दिसून येते. या उपक्रमांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिंदे यांच्या नेतृत्वाचे कौतुक होत आहे.

> उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे महाराष्ट्राच्या विकासाचे आणि जनकल्याणाचे प्रतीक आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पारनेर तालुक्यातील शाळांमध्ये प्रिंटर, टिफिन बॅग यांसारखे उपयुक्त साहित्य वाटप करून आम्ही त्यांच्या लोकाभिमुख विचारसरणीला जपत आहोत. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण व बालकल्याणासाठी सातत्याने कार्यरत राहू. शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाने पारनेरचा विकास अधिक गतिमान होईल.
>
> **- शिवसेना नेते सुजित झावरे पाटील (माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद अहिल्यानगर)**

# त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराचा महाशिवरात्री महोत्सव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पिंपळगाव रोठा ता पारनेर येथील गावातील गावठाणातील पुरातन श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराचा महाशिवरात्री महोत्सव समस्त ग्रामस्थ पिंपळगाव रोठा यांच्या नियोजनात धार्मिक कार्यक्रमात किर्तन,फराळ महाप्रसाद इत्यादी नियोजनात रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी संपन्न करण्यात येणार आहे. येथील पुरातन मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे सकाळचे सुर्याची पहीली किरणे हि महादेवाच्या पिंडीवर पडत असतात.पुर्वाभिमुख छोटेखानी असलेल पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार व कलशारोहण सोहळा सन.२००४ साली विश्वगौरव विभूषित महान तपस्वी गगनगिरी महाराज आणि राष्ट्रसंत भैय्युजी महाराज यांच्या शुभहस्ते झालेले होते. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री महोत्सवाचे निमित्ताने सकाळी ६ वाजता महारुद्राभिषेक, महापुजा, महाआरती सकाळी १० वाजता गायनाचार्य उज्वलाताई महाराज वाकळे (संगमनेर) यांचे शिव माहात्म्यावर किर्तन सेवा होईल.



सन २००४ सालापासून सालाबादप्रमाणे श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष अँड. पांडुरंग गायकवाड साहेब यांच्या मातोश्री कै.सौ. उल्हासाबाई विठ्ठल गायकवाड यांच्या स्मरणार्थ या सोहळ्याची किर्तन सेवा बिदागी दिली जाते. दुपारी १२ वाजता साबुदाणा खिचडी फराळ , केळीचा महाप्रसाद भाविक भक्तांना पंगतीतून दिला जाईल. फराळ महाप्रसादात पिंपळगावरोठा गावातील भाविक भक्त साबुदाणा, शेंगदाणे, मिरची,तेल,केळी इत्यादी वस्तूरुप दान स्वईच्छेने दरवर्षी देत असतात. सर्वांच्या योगदानातुन व सेवाभानेतुन भव्य महाप्रसाद अन्नदानाचा सोहळा महाशिवरात्रीला पिंपळगावरोठा गावात संपन्न होतो. या सोहळ्याला हजारो भाविक भक्त महीला बहिणी, पुरूष, वयोवृद्ध , तरूण मंडळी सर्वजन भक्तीभावाने सहभागी होऊन शिव नामस्मरणात दंग होतात. यावर्षी समाज रत्न दानशूर डॉ.नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आणि पारनेर तालुक्याचे समाजभुषण श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष अँड पांडुरंग गायकवाड साहेब. हे उपस्थित राहणार आहेत तर श्री खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, जय मल्हार विद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक , कर्मचारी वृंद जय गगनगिरी सेवाभावी मंडळ गावातील भजनी मंडळे तरुण मंडळे, ग्रामस्थ मुंबईकर, पुणेकर मंडळी इत्यादींचे कार्यक्रम नियोजन सेवाभाव भक्ती असुन मोठ्या संख्येने भाविक भक्त ग्रामस्थ यांनी उपस्थित राहून दर्शन, किर्तन, फराळ महाप्रसादाचा लाभ घ्यावा . असे आवाहन श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान आणि नियोजकांतर्फे करण्यात आले आहे.




ठाणे : दिवा विकास प्रतिष्ठान आयोजित महीलांसाठी खेळ पैठणीचा व हळदीकुंकू समारंभ शिवसेना शाखा, रिलायन्स टॉवर, मुंब्रादेवी कॉलनी येथे आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी शिवसेना नगरसेवक शैलेश मनोहर पाटील व नगरसेविका दिपाली उमेश भगत यांची विशेष उपस्थिती लाभली तर प्रसंगी असंख्य महिलांनी बक्षीसांची लयलूट केली तर शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### श्रीमती सिंधु वामन देठे यांचे दुःखद निधन!

**गणोरे (स. गांवकरी) :** श्रीमती सिंधु वामन देठे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी मंगळवार दि.३ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मूलं एक मुलगी सुना, नातू व जावई असा मोठा परिवार आहे. विलास, विकास वामन देठे व सौ.सिमा बाळासाहेब आहेर यांच्या त्या आई होत. नवसारी (गुजराथ ) येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी विरावली अमरधाम नवसारी ( गुजरात ) येथे सकाळी ८ .०० होणार आहे.

### श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन उत्साहात साजरा; महाप्रसादाचे वाटप



**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** बालिकाश्रम रोड, येथील गीते हॉस्पिटल जवळ,संतकृपा गणेशराव बकाल,डॉ.निलेश बकाल व डॉ.अपर्णा बकाल यांच्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त श्री गजानन महाराजांची मूर्तीची आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. प्रगट दिनानिमित्त श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.सायंकाळी श्री गजानन महाराजांची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी माजी नगरसेविका शितलताई जगताप यांनी दर्शन घेतले.यावेळी डॉ.बकाल परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. महाआरतीनंतर भाविकांना पिठलं भाकरीचा महाप्रसाद देण्यात आला.यावेळी बालिकाश्रम रोड व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वॉरियर्सचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** आजच्या पिढीला आवश्यक असलेले सुसंस्कार वॉरियर्स मधील शिक्षकवृंद देत असुन बालकांचे मानसशास्त्र ओळखून त्यांना शिक्षण देण्याचे काम या ठिकाणी होत आहे. त्यामुळे या बालकांची शिक्षणाची गोडी वाढत आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध सूत्रसंचालक तथा कलावंत उद्धव काळापहाड यांनी केले. वॉरियर्स प्री प्राइमरी स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन च्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य अंजना पंडित या होत्या तर पाहुण्या म्हणून मिरा राजेंद्र उदागे, उद्धव काळापहाड हे होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, बाल वयात होणारे संस्कार महत्त्वाचे असून वॉरियर्सच्या शिक्षिका जीव ओतून ते काम करत आहेत. माजी प्राचार्य अंजना पंडित बोलताना म्हणाल्या की, बालकांना त्यांच्या मनाप्रमाणे, आवडी निवडी प्रमाणे शिक्षण दिल्यास चांगल्या पद्धतीने ते आकलन करू शकतात, बाल वयात मिळणारी संस्काराची शिदोरी ते आयुष्यभर सांभाळतात. पालकांनी निश्चितपणे या शाळेत प्रवेश घेऊन आपले मुले सुसंस्कारित करावीत. यावेळी मिरा उदागे यांनी शुभेच्छा दिल्या. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने बाल राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व बाल कलाकारांचा तसेच वॉरियर्सच्या शिक्षकांचा सत्कार शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, सप्तरंग चे अध्यक्ष डॉ.श्याम शिंदे, सुनील गोसावी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वॉरियर्स फाउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला गोसावी यांनी केले तर सूत्रसंचालन कवयित्री सुरेखा घोलप यांनी केले. शेवटी आरती गिरी यांनी आभार मानले. कार्यक्रमास संदीप गोसावी, शर्मिला रणधीर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका स्मृती घोडेस्वार, हर्षली गिरी, वर्षा गुजर, संगीता गिरी, संदीप गोसावी, बबनराव गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा गजानन महाराज मंदिरात साजरा



**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** गण गण गणात बोते च्या जयघोषात सावेडीतील गुलमोहर रोडवरील नवले नगर गजानन महाराज मंदिरात श्री गजानन महाराज प्रकट दिन सोहळा नवले नगर रहिवासी सेवा संस्था (ट्रस्ट) यांच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी महिला भाविकांची गर्दी होती सकाळी लघु रुद्राभिषेक, गुलमोहर रोड परिसरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. दुपारी महाआरती करून भाविकांना महाप्रसाद देण्यात आला यावेळीआमदार संग्राम जगताप,शीतल जगताप, महापौर सौ.ज्योती गाडे, नगरसेविका सौ.गौरी बोरकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, योगिराज गाडे, अमोल गाडे, अजिंक्य बोरकर,आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते. असा होता महाप्रसाद २०० किलो भरडा, २०० किलो तांदूळ, २०० किलो पिढल, २०० किलोच्या ज्वारी भाकरी, ४० किलो मिरच्या ठेचा, ५०० गडया भाजी यांचा वापर केला होता.

# बळीराजा शेत-पाणंद रस्त्यांना गती!

## आ. काशिनाथ दातेंच्या अध्यक्षतेखाली क्षेत्रस्तरीय समितीची बैठक संपन्न




"मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रस्तावित व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. समिती अध्यक्ष आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिलेल्या सूचनांनुसार संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून रस्त्यांची कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण करण्यावर भर दिला जाईल."

- श्रीकुमार चिंचकर, प्रांताधिकारी, पारनेर - श्रीगोंदा

"शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न सोडविण्यासाठी बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना अत्यंत महत्त्वाची आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करून योजनेचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येईल."

- सौ. गायत्री सौंदाने, तहसीलदार पारनेर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या पुढाकाराने व अध्यक्षतेखाली क्षेत्रस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक पारनेर येथील तहसील कार्यालयात संपन्न झाली. शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि शेतरस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी ही बैठक निर्णायक ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सूचनेनुसार सोमवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सौ. गायत्री सौंदाने यांचेसह पोलिस निरीक्षक नितीन खंडागळे, कृषी अधिकारी गजानन घुले, उप अभियंता सुबोध वसईकर, किरण जाधव , भुमी अभिलेख पाटील व संबंधित विभागांचे अधिकारी व क्षेत्रस्तरीय समितीचे मान्यवर सदस्य उपस्थित होते.

या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रस्तावित व प्रलंबित रस्त्यांचा आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांना वर्षभर सुरक्षित व सुलभ दळणवळण मिळावे, शेतीमाल वाहतुकीस अडथळे येऊ नयेत, तसेच रस्त्यांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण व्हावीत, याबाबत आमदार काशिनाथ दाते सर यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

शेतकरी केंद्रस्थानी ठेवून विकासकामे राबविणे हा आपला प्राधान्यक्रम असून, बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना ही केवळ रस्ता बांधकामापुरती मर्यादित नसून ती शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीशी जोडलेली असल्याचे आमदार दाते सर यांनी यावेळी नमूद केले. कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये व योजनेचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीमुळे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या प्रश्नांना निश्चितच चालना मिळणार असून, आगामी काळात शेत-पाणंद रस्त्यांची कामे वेगाने मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# उमेदवारांच्या प्रतिक्रिया

**------ : (समर्थ गांवकरी)**

शिवनेरी वार्ताहर :

# ओतूर धालेवाडी जिल्हा परिषद गटातून सर्वच मतदारांनी ११ हजार ४४६ मतांनी निवडून दिल्याबद्दल जाहीर आभार व अभिनंदन मतदारांना दिलेला शब्द पूर्ण करणार आहे असे विजयी उमेदवार जिल्हा परिषद सदस्या छाया अतुल तांबे यांनी याप्रसंगी सांगितले.

# ओतूर धालेवाडी जिल्हा परिषद गटातील मायबाप जनतेने निवडणूक प्रक्रियेत मला दिलेलं प्रेम पाठिंबा आणि विश्वास त्यासाठी मी आपली मनापासून आभारी आहे . आपण दिलेला ९७३८ चा निकाल पूर्ण नम्रतेने आणि लोकशाही मूल्यांचा आदर ठेवून स्वीकारते. हा पराभव माझ्यासाठी शेवट नसून नव्या जबाबदारीची जाणीव करून देणारा टप्पा आहे असे पराभूत जिल्हा परिषद उमेदवार अक्षदा प्रसाद पानसरे यांनी याप्रसंगी सांगितले.

# पंचायत समिती गणातून आपण सर्व मतदारांनी ५०७८ निकालातून टाकलेला विश्वास सार्थक करून दाखवणार असे विजय उमेदवार उल्का बबन मोरे यांनी याप्रसंगी सांगितले.

#ओतूर पंचायत समिती गण मधून मतदारांनी ४८५७ चा कौल दिलेला मान्य असून या पराभवातून खचून न जाता नागरिकांची सेवा करणार असे डॉक्टर सुनिता दौलत नायकोडी यांनी याप्रसंगी सांगितले.

# रोहकडी पंचायत समिती गणातून मतदारांनी ५७७४ या मतांनी विजय केल्याबद्दल मतदारचे आभार तसेच पंचायत समितीच्या माध्यमातून या भागातील विकास करणार असे प्रशांत सखाराम डुंबरे यांनी याप्रसंगी सांगितले.

# रोहकडी पंचायत समिती गणातील निवडणुकीत मला ५४६३ मतदान करून दाखवणाऱ्या सर्व मतदार बांधवांचे आभार निकाल अपेक्षा प्रमाणे नसला तरी मला मिळालेले प्रेम आणि सहकार्य हे माझ्यासाठी फार मोलाचे आहे असे सचिन नामदेव घोलप यांनी याप्रसंगी सांगितले.

# ओतुर धालेवाडी जिल्हा परिषदेतील गटातील पराभूत

# बांधकाम विकासकाच्या कर्मचाऱ्याची ग्राहकाला मराठी बोलण्याहून शिवीगाळ ; पोलीस तक्रार दाखल

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

डेल्टा सेक्टर झिरो, ट्रायसिटी, ऐरोली येथील संबंधित बिल्डरच्या कार्यालयातून एका मराठी ग्राहकास फोन करण्यात आला. सदर ग्राहकाने "मला हिंदी समजत नाही, कृपया मराठीत बोला" अशी नम्र विनंती केली असता, समोरील व्यक्तीने अत्यंत अर्वाच्य, अपमानास्पद व शिवीगाळयुक्त भाषेत ग्राहकाचा अवमान केला, हिंदी सर्वांना समजते, हिंदी राष्ट्रभाषा आहे, हिंदीत बोला. महाराष्ट्रात राहून, व्यवसाय करून मराठी भाषेचा व मराठी माणसाचा अपमान सहन केला जाणार नाही. हा प्रकार केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण मराठी समाजाच्या स्वाभिमानावर घाला घालणारा असल्याने मराठी एकीकरण समितीचे शिलेदार तत्काळ संबंधित बिल्डरच्या कार्यालयात दाखल झाले. यावेळी नवी मुंबई शहर अध्यक्ष योगेश मोहन यांनी स्वतः संघटनेच्या शिलेदारांसोबत थेट भेट घेऊन संबंधितांना जाब




## मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी आक्रमक

विचारला व सदर घटनेप्रकरणी तात्काळ गुन्हा नोंद करण्यात यावा अशी ठाम मागणी केली.

संघटनेच्या ठाम भूमिकेनंतर व पाठपुराव्यानंतर संबंधित कंपनीविरोधात कायद्यानुसार तक्रार दाखल करण्यात आली आहे. मराठी भाषेचा अवमान, शिवीगाळ व धमकी देणाऱ्या प्रवृत्तीविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती झाल्यास आंदोलनात्मक मार्गाने उत्तर दिले जाईल अशी स्पष्ट भूमिका एकीकरण समितीने मांडली. प्रसंगी मराठी एकीकरण संघटनेचे नवी मुंबई अध्यक्ष योगेश मोहन, उपाध्यक्ष ओमकार जाधव, संघटक राजेश गर्जे, पनवेल उपाध्यक्ष विनायक पाटील, सचिन टेमकर, अजय रेवाळे, सुनिल शिंदे, वैभव गायकवाड, सागर भणगे, रामसिंग जाधव इतर शिलेदार उपस्थित होते.

राज्यात व्यवसाय करत असताना मराठीचा व मराठी माणसाचा अपमान सहन केला जाणार नाही, आम्ही कोणत्याही भाषेचा, भाषकांचा द्वेष करत नाही पण महाराष्ट्रात मराठीचा सन्मान झालाच पाहिजे. वेळोवेळी या वृत्तीविरोधात रस्त्यावर उतरून कायदेशीर मार्गाने विरोध केला जाईल आणि यांना धडा शिकवला जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

# पावर लिफ्टिंग स्पर्धेत सारडा महाविद्यालयाचे खेळाडूंचे घवघवीत यश

## पावर लिफ्टिंग स्पर्धेत खेळाडूंची अभिमानास्पद कामगिरी - डॉ.पारस कोठारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पेमराज सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये यश संपादन केले. सातारा येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत श्रीकृष्ण सूर्यवंशी व सोहम गड्डम या खेळाडुंनी उत्कृष्ट यश मिळविल्याने सारडा महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे.



पावर लिफ्टिंग स्पर्धेत खेळाडूंनी केलेली कामगिरी ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे.

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हिंद सेवा मंडळाचे सर्व संचालक व पदाधिकारी कायम तत्पर असतात. असे प्रतिपादन सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी केले आहे.

विजयी विद्यार्थ्यांचा सत्कार हिं.से.मंडळाचे उपाध्यक्ष मधुसूदन मुळे सर यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

शालेय राज्यस्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालय चा श्रीकृष्ण सूर्यवंशी १२वी सायन्स चा विद्यार्थी याने १९ वयोगटात पावर लिफ्टिंग शालेय राज्य स्पर्धेत १०५ किलो गटामध्ये ३९५कि.ग्र. वजन उचलून राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) पटकावलं आहे.हरियाणा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय पावरलिफ्टिंग स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.तसेच १९ वर्ष वयोगटात सोहम गड्डम (१२ वी कॉमर्स)याने ९३ किलो वजन गटात ५०० कि.ग्र.वजन उचलून सिल्व्हर मेडल मिळविल्याबद्दल सारडा महाविद्यालयाच्या वतीने दोन्ही खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,ज्येष्ठ मार्गदर्शक मधुसुदन मुळे,अँड.अनंत फडणीस,अजित बोरा,जुनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी,अनंत देसाई,उपप्राचार्य गिरीश पाखरे,प्रबंधक अशोक असेरी,प्रा.अक्षय कर्डिले, प्रा.संदेश पिपाडा,सहाय्यक सचिव योगेश देशमुख,गोवर्धन पांडुळे,गोरडे सर आदी उपस्थित होते.

हिंदसेवा मंडळाच्या पदाधिकारी यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा.संजय साठे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# हत्तीरोग दुरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहीम

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

हत्तीरोग दुरीकरणासाठी महाराष्ट्र राज्य शासन वचनबद्ध असून त्या अनुषंगाने राज्यातील सहा जिल्ह्यांतील १६ तालुक्यांमध्ये दि. १० ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सार्वत्रिक औषधोपचार मोहीम (एम.डी.ए.) राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने भिवंडी तालुक्यात जनजागृतीसाठी मोबाईल आरोग्य जनजागृती व्हॅनचा वापर करण्यात येत आहे. या व्हॅनचे उद्घाटन व हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते करण्यात आला. ही मोहीम जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, ठाणे व Godrej Embed – FHI संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती शिंदे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. बालाजी गावडे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी संजय जाधव, जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.



या मोहिमेंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी भेट देऊन नागरिकांना हत्तीरोगविरोधी गोळ्या खाऊ घालणार आहेत. ठाणे जिल्ह्यात भिवंडी तालुक्यामध्ये ही मोहीम जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून तांत्रिक नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे व जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत एकूण ७ लाख १२ हजार ४९ पात्र लाभार्थ्यांना हत्तीरोगविरोधी औषधे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहिमेमध्ये सहभागी होऊन आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यात भिवंडी तालुक्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव अधिक असल्याने ही मोहीम प्रामुख्याने भिवंडी तालुक्यात राबविण्यात येत आहे. तालुक्यातील एकूण पात्र लोकसंख्या ५ लाख ८ हजार ७६५ इतकी असून स्थलांतरित पात्र लोकसंख्या २ लाख ३ हजार २८४ इतकी आहे. यामध्ये वीटभट्ट्या, गोदामे, नवीन बांधकामे, कारखाने आदी ठिकाणी कार्यरत व्यक्तींचा समावेश आहे. अशा पद्धतीने एकत्रित ७ लाख १२ हजार ४९ नागरिकांना औषधे देण्यात येणार आहेत.

हत्तीरोग हा सार्वजनिक आरोग्यासमोरील गंभीर प्रश्न असून संक्रमित डास चावल्यामुळे पसरणारा व दीर्घकालीन अपंगत्व निर्माण करणाऱ्या प्रमुख आजारांपैकी एक आहे. बहुतांश वेळा बालवयात संसर्ग होतो, मात्र त्याची लक्षणे प्रौढावस्थेत दिसून येतात. या आजारामुळे शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीचा महत्त्वाचा भाग असलेल्या लसिका संस्थेचे नुकसान होते व वेळीच प्रतिबंध न केल्यास शरीराच्या विविध भागांमध्ये असामान्य सूज निर्माण होऊ शकते. या आजारावर कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नसून प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे.

# यूएई माध्यमांकडून जागतिक व्यापार संधींचा विस्तार करण्यासाठी फिक्की पुणे मध्ये बी2बी बैठकांचा विचार करा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

फेडरेशन ऑफ इंडिया चैंबर ऑफ कॉमर्स एंड इंडस्ट्री (फिक्की), शारजाह एअरपोर्ट इंटरनेशनल फ्री जोन (सैफ जोन), शारजाह सरकार, यूएई के सपोर्ट से आणि महाराष्ट्र चैंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री एंड एग्रीकल्चर (MACCIA) सह मिलकर, पुणे येथे "यूएई के माध्यम से सुरक्षितता बाजारामध्ये आपला व्यापार वाढवा" या विषयावर केंद्रीत बी२बी बैठकांची एक मालिका उत्तर द्या.

बी२बी बैठकी १०-११ फेब्रुवारी २०२६ या पहलचा उद्देश पुणे आणि व्यापक महाराष्ट्र क्षेत्राचे व्यवसाय को यूएई मध्ये, विशेष रूप सेफ जोन के माध्यम से संचालन स्थापित करण्यासाठी लाभांबद्दल माहिती निर्माण करणे आहे. फ जोन क्षेत्र सर्वात उन्नत, लागत प्रभावी आणि गुंतवणूकदार-



अनुकूल मुक्त व्यक्तींमध्ये एक आहे. सत्रांमध्ये या गोष्टीवर प्रकाश टाकला जाईल की यूएई मध्य पूर्व, आफ्रिका, युरोप आणि अन्य स्थानिक बाजारांमध्ये बाजार पोहोचवणाऱ्या भारतीय कंपन्यांसाठी एक रणनीती वैश्विक प्रवेश द्वार म्हणून कार्य करते.

सेफ जोन के वरिष्ठ अधिकारी कंपनी, लायसिंग, वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स समाधान आणि बाजार-प्रवेश रणनीतींवर व्यावहारिक माहिती प्रदान करण्यासाठी भाग घेणारी कंपन्यांशी चर्चा करा. प्रतिभावंतांना हेही व्यापक समजावून सांगण्याची व्यापार सुविधा, रिफ लाभ आणि सुव्यवस्थित नियामक प्रक्रियेसाठी भारत-यूए आर्थिक भागीदारी समझौते (सीईपीए) चा लाभ कसा उठवायचा. रजिस्ट्रेशन आणि बैठक निरोधक खात्री करण्यासाठी, कृपया श्री आशुतोष यांना 9650903299 वर संपर्क करा.

# आगळीवेगळी 'न्याय वैद्यक कार्यशाळा' संपन्न

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य तसेच अपेक्स कन्सल्टन्सीचे डॉ. सोलंकी व त्यांच्या संपूर्ण टीमने पुन्हा एकदा आगळ्यावेगळ्या स्वरूपाची 'न्याय वैद्यक कार्यशाळा (CME)' आयोजित केल्याबद्दल सर्व उपस्थित डॉक्टरांकडून मनापासून आभार व्यक्त करण्यात आले.

कार्यशाळेसाठी दिलेला बहुमूल्य वेळ व केलेले मार्गदर्शन सर्वांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले. विशेष म्हणजे, धन्वंतरी पूजन अथवा दीपप्रज्वलनासारख्या परंपरागत पद्धतीऐवजी देशाच्या सर्वोच्च कायद्याचे प्रतीक असलेल्या संविधान वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कायदेविषयक कार्यक्रमाची अशी सुरुवात करून आयोजकांनी देशासाठी एक नवा आदर्श निर्माण केला. यामधून कायद्यासमोर व डॉक्टरांसमोर सर्व समान आहेत हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.



कार्यशाळेदरम्यान सर्व डॉक्टरांनी व्याख्याने अत्यंत मन लावून ऐकली. कायदेविषयक माहिती सामान्यतः रुक्ष वाटते; मात्र श्री. किरण शिंदे साहेब (पोलीस निरीक्षक, श्रीगोंदा) यांनी भावनिक स्पर्श देत, सोप्या व समजेल अशा पद्धतीने विषय मांडला. प्रत्येकाच्या अधिकारांसोबतच कर्तव्य व जबाबदारीची जाणीव हलक्या-फुलक्या शैलीत करून देण्यात आली.

सुमारे दोन ते अडीच तास चाललेल्या या CME मधून प्रत्येक सहभागी डॉक्टरांना नवी व उपयुक्त माहिती मिळाली. कायद्याच्या कचाट्यात अडकू नये यासाठी कायद्याच्या चौकटीत राहूनच काम कसे करावे याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले.

कोणालाही विशेष फोन न करता सर्व डॉक्टर मित्रांनी दिलेल्या उत्स्फूर्त उपस्थितीबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. तसेच, शंका-कुशंका मांडण्याची संधी दिल्याबद्दल संयोजकांचेही विशेष आभार मानण्यात आले. भविष्यात अशाच नाविन्यपूर्ण विषयांवर CME आयोजित कराव्यात, अशी विनंती असोसिएशनच्या अध्यक्षांकडे करण्यात आली.

# श्रीगोंद्यात आंदोलन व आमरण उपोषण

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

बहुजन समाज पार्टीच्या वतीने सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथे विविध सामाजिक व न्यायाच्या मागण्यांसाठी आंदोलन व आमरण उपोषण करण्यात आले. या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यात संपूर्ण दारूबंदी लागू करावी, सर्व भूमिहीन कुटुंबांना उपजीविकेसाठी प्रत्येकी पाच एकर जमीन मोफत द्यावी, अतिक्रमित जमिनी संबंधितांच्या नावावर नियमित कराव्यात, तसेच सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. यासोबतच कोकणगाव येथील रजपूत खून प्रकरणातील मुख्य आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी रजपूत कुटुंबीयांनीही आमरण उपोषण सुरू केले होते.

# उज्वल भविष्यासाठी शिक्षण महत्त्वाचे : दिग्विजय नागवडे

- व्यंकनाथ विद्यालयाच्या एसएससी विद्यार्थ्यांना निरोप

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

शालेय जीवनात उज्वल भविष्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून, माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांचा पाया भक्कम असणे तितकेच आवश्यक आहे, असे प्रतिपादन युवा नेते दिग्विजय नागवडे यांनी केले. श्रीगोंदा तालुक्यातील व्यंकनाथ विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या उपसरपंच चित्राताई पवार होत्या. यावेळी व्यासपीठावर युवा नेते दिग्विजय नागवडे, कारखान्याचे राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा, माजी संचालक विलासराव काकडे,



कमिटी सदस्य अकबरभाई इनामदार, पुरुषोत्तम लगड, माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे, एम. आर. पवार सर, बंडोपंत खंडागळे, प्राचार्य बाळासाहेब जठार, मल्हारी शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक सहकार महर्षी दिवंगत शिवाजीराव नागवडे बापू तसेच सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मार्गदर्शन करताना दिग्विजय नागवडे म्हणाले की, दहावीनंतर विद्यार्थ्यांनी योग्य करिअरची निवड करावी. ध्येय निश्चित करण्यासाठी परिपूर्ण अभ्यास आवश्यक असून, शिस्त आणि सातत्य यांचा अंगीकार केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी पाचवी ते दहावीपर्यंतच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या संस्कार, मार्गदर्शन व मायेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात शिक्षिका अश्विनी शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येकाने स्वतःच्या "मेंटल स्केल" चा योग्य वापर केला, तर जीवनातील ध्येय निश्चित गाठता येते. यावेळी राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा, माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे, ग्रामपंचायत सदस्य बंडोपंत खंडागळे, कला शिक्षक अभिषेक उदमले आदींनी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले की, शासनाने दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी कॉपीमुक्त अभियान राबविले आहे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिक अभ्यास करून गुणवत्तेत वाढ करावी व विद्यालय तसेच गावाचे नाव उज्वल करावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सुहानी काळदाते हिने केले, तर आभार उपशिक्षक संदेश झेंडे यांनी मानले.

# उद्योजकांना त्रास देणाऱ्यांना ठोकून काढणार : मुख्यमंत्री

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

औद्योगिक क्षेत्रात झुंडशाही-गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्राची वेगाने वाढ होताना येथे काहीजण उद्योजकांना त्रास देण्याचे 'उद्योग' करत आहेत, अशी माहिती मिळाली आहे.

उद्योजकांना होणारा त्रास सहन केला जाणार नाही. अशा घटकांना ठोकून काढू, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. लगेच त्यांनी ठोकून काढू म्हणजे कायद्याने ठोकून काढू, अशीही पुष्टी जोडली.

अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खासगी प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार काशिनाथ दाते, आ. बबनराव पाचपुते, ह.भ.प. नामदेवशास्त्री, ह.भ.प. महंत शिवाजी महाराज उपस्थित होते.



फडणवीस म्हणाले, नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असेल तर अधिकृत यंत्रणेकडे दाद मागा. मात्र, त्यांना दिलेला त्रास खपवून घेतला जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्रात नवे उद्योग येत असताना येथे काही वाईट 'उद्योग' तयार झाले आहेत. काहीजण उद्योजकांना त्रास देत असल्याची माहिती मिळाली आहे. 'इज ऑफ डूइंग बिजनेस', उत्पादन खर्च कमी व कायदा-सुव्यवस्था या आधारावर महाराष्ट्रात उद्योग वाढ होत आहे. मात्र, अशा परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील एखादी छोटी घटनाही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गांभीर्याने घेतली जाईल.

जिल्हा पोलिस अधीक्षकांना मी तशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रात उद्योग वाढताना पर्यावरणही जपायचे आहे. त्यामुळे उद्योग हे पर्यावरणपूरकच असायला हवेत. उद्योगवाढ व पर्यावरण एकत्र साधायचे आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वी उद्योग वाढ केवळ मुंबई-पुणे क्षेत्रातच होत होती. आता उद्योग वाढीचेही विकेंद्रीकरण सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात उद्योग सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी 'मेक इन इंडिया' महत्त्वाचे आहे. त्या माध्यमातून आयातीला पर्याय निर्माण करण्याचे प्रयत्न आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# पोलिस हेड कॉन्स्टेबल बडतर्फ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शिरूर (जि. पुणे) पोलिसांनी अटक केलेला नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेचा कर्मचारी श्यामसुंदर गुजर हाच ड्रग्ज तस्करीचा मास्टर माईंड निघाला. त्याला यापूर्वीच पुणे पोलिसांनी अटक केलेली असून त्याचा ड्रग्ज तस्करीच्या गुन्ह्यात थेट सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्याच्यावर जप्त मुद्देमालाचा अपहार केल्याचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिस हेडकॉन्स्टेबल गुजर यांच्यावर दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्याला शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेत नेमणुकीस असलेल्या गुजर यांने जिल्हा पोलिसांच्या मुद्देमाल कक्षातून एक कोटी ९ लाख ७५ हजारांचे १० किलो ९७५ ग्रॅम ड्रग्स चोरल्याचे चौकशी समितीच्या अहवालावरून स्पष्ट झाले.

# नवी मुंबई, पावणे गावात पावणेश्वर शिवमंदिरात कलश व मूर्ती स्थापना सोहळा भक्तीभावात संपन्न

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबईतील पावणे गाव येथे पुरातन पावणेश्वर शिवमंदिरात ग्रामस्थांच्या पुढाकाराने आणि शिवभक्तांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत कलश व मूर्ती स्थापना सोहळा भक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. या पवित्र विधीमुळे संपूर्ण परिसरात मंगलमय आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये आनंद व उत्साहाचे चित्र दिसून आले.

याप्रसंगी मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करण्याचा संकल्प करण्यात आला. पावणेश्वर देवस्थानच्या पवित्र सानिध्यात आयोजित या विशेष सोहळ्यास महामंडलेश्वर श्री श्री १००८ दिगंबरानंद सरस्वती स्वामी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



स्वामी महाराजांच्या मंगल हस्ते कोल्हापूर येथील बालयोगी श्री मधुसूदन महाराज पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. ग्रामस्थांनी मंदिराच्या विकासासाठी भविष्यातही एकजुटीने कार्य करण्याची ग्वाही दिली.

पावणेश्वर मंदिर हे पावणे गावाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वाचे केंद्र असून या सोहळ्यामुळे मंदिराच्या वैभवात नवा अध्याय जोडला गेला आहे.

# डंपरच्या धडकेत तरुण दुचाकीस्वाराचा मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मनमाड महामार्गावरील अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. रविवारी अस्तगाव शिवारात मुरमाने भरलेला डंपर आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत एका तरुण दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. मुरमाने भरलेला डंपर (क्रमांक एमएच-१७ सीव्ही ३५०२) बाभळेश्वरकडून राहात्याच्या दिशेने जात होता. त्याच वेळी राहात्याकडून बाभळेश्वरकडे जाणारी दुचाकी (क्रमांक एम एच १७ सिएस ८०७९) अस्तगाव शिवारातील हॉटेल वसंत बहार समोर आली असता, दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकी चालक श्रीकृष्ण रामेश्वर तारडे याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच प्राण गेला. अपघात घडताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, अपघाताचे भीषण स्वरूप पाहून डंपर चालक आपले वाहन सोडून घटनास्थळावरून फरार झाला. राहाता पोलिसांनी तत्काळ डंपर ताब्यात घेतला असून फरार चालकाचा शोध घेण्यासाठी चक्रा फिरवली आहेत. घटनेची माहिती मिळताच राहाता पोलीस स्टेशनचे पीएसआय शरद लेंडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिस्थिती हाताळत मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला हटवून विस्कळीत झालेली वाहतूक पोलिसांनी सुरळीत केली.

# शेतकऱ्यांप्रती असलेली बांधिलकी विसरू नका - डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

- जलसंपदा विभागाच्या पंचम राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा समारोप
- गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला सर्वसाधारण विजेतेपद

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

"मैदानातील हार-जीत पेक्षा सहभाग महत्त्वाचा असतो. खेळात हार-जीत होतच असते, मात्र मनाने हारलेला माणूस आयुष्यात कधीच जिंकू शकत नाही. त्यामुळे खेळाडूवृत्ती जोपासत अपयशाने खचून न जाता जिद्दीने पुन्हा उभे राहिले पाहिजे. जलसंपदा विभागावर राज्याच्या शेतकऱ्यांची मोठी जबाबदारी असून, शेतकऱ्यांच्या प्रति असलेली ही बांधिलकी विसरू नका," असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

लोणी - शिर्डी येथे संपन्न झालेल्या जलसंपदा विभागाच्या पंचम राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या समारोप सोहळ्यास साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिकचे मुख्य अभियंता तथा स्पर्धेचे मुख्य समन्वयक प्रकाश मिसाळ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमणवार, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत बोरकर, 'मेरी' नाशिकचे महासंचालक संजीव टाटू, मंत्रालयाचे मुख्य अभियंता व सहसचिव राजेंद्र काटपल्लीवार, मुख्य अभियंता व सहसचिव प्रसाद नार्वेकर, पुणे येथील विनिर्दिष्ट प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजीव चोपडे, तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य अभियंता राजेश मोरे, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक सुनंदा जगताप, नागपूर येथील गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता जयंत गवळी, जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभागाचे मुख्य अभियंता सुदर्शन पगार, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुश्मिता विखे पाटील व शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय शेळके आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.विखे म्हणाले, पाणी हे जीवन असून जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी हीच या विभागाची खरी अनमोल 'संपदा' आहे. दैनंदिन कार्यालयीन कामकाज व नियोजनाचा ताण बाजूला सारून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेतून आपल्यातील उत्तम क्रीडापटू व कलाकाराचे दर्शन घडवले, ही बाब कौतुकास्पद आहे.

स्पर्धेतील हा उत्साह व ऊर्जा अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या दैनंदिन कामकाजातही कायम ठेवावी. पाण्याप्रमाणे प्रवाही राहून व चांगले आरोग्य राखून विभागाचे काम अधिक सक्षमपणे करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शिर्डी ही साईबाबांची पुण्यभूमी असून येथून 'श्रद्धा व सबुरी' चा संदेश मिळतो. सहकार चळवळीच्या माध्यमातून या परिसरात शिक्षण व आरोग्य क्षेत्रात मोठे कार्य उभे राहिले असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवली जात असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. अहिल्यानगर जिल्ह्याच्या कन्यांनी क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवला आहे. या 'स्त्री शक्ती' चा सन्मान व्हावा या उद्देशाने स्थानिक आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा या कार्यक्रमात विशेष गौरव करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उपस्थित आंतरराष्ट्रीय खेळाडूंनीही आपले विचार मांडले. आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू कुमारी फिजा सय्यद यांनी "आरोग्य हीच खरी संपत्ती" असल्याचा संदेश दिला. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या कोमल वाकळे यांनी कार्यालयात कामाची निष्ठा आणि मैदानावरील उत्साह यांचा मेळ घालण्याचे आवाहन केले. तसेच, जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार विजेत्या डॉ. शुभांगी दळवी यांनी "जल हे जीवन आहे आणि खेळ हा जीवनाचा आत्मा आहे," असे सांगत हार-जीत पेक्षा खेळातून मिळणारा आनंद महत्त्वाचा असल्याचे सांगितले. ही स्पर्धा प्रवरानगर व शिर्डी येथे ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेत विविध १० विभागांत सुमारे १६५० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. या तीन दिवसांच्या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी पटकाविले. स्पर्धेचे 'जलवीर' हे बोधचिन्ह सर्वांचे आकर्षण ठरले.

# निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने घवघवीत यश

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने घवघवीत यश संपादन करत तालुक्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. जिल्हा परिषदेच्या ५ पैकी ३ तर पंचायत समितीच्या १० पैकी तब्बल ८ जागांवर विजय मिळवत राष्ट्रवादीने स्पष्ट बहुमत मिळवले. शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षांच्या आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही. या आघाडीला जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रत्येकी दोन जागांवर समाधान मानावे लागले.



जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी आघाडीवर

शिनोली–बोरघर गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीला राजेंद्र लोहकरे या १०,३६७ मते मिळवत विजयी झाल्या. त्यांनी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या सरिता माळी यांचा ३,६४२ मतांनी पराभव केला.

पेठ–घोडेगाव गटात शिवसेनेच्या सुवर्णा दरेकर यांनी ११,६७४ मते मिळवत राष्ट्रवादीच्या मंगल हुले यांचा ३०६ मतांनी पराभव केला. कळंब–चांडोली गटात राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रीती थोरात या १५,६११ मते मिळवत १,५६१ मतांनी विजयी झाल्या. त्यांनी राष्ट्रवादीच्या तुलसी भोर यांचा पराभव केला.

पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक–जारकरवाडी गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विवेक वळसे पाटील १३,८०९ मते मिळवत २,८०७ मतांनी विजयी झाले. त्यांनी शिवसेनेचे अरुण गिरे यांचा पराभव केला.

अवसरी बुद्रुक–पिंपळगाव गटात राष्ट्रवादीचे विष्णू काका हिंगे पाटील १०,८७८ मते मिळवत ६०५ मतांनी विजयी झाले.

पारगाव–जारकरवाडीतील हायव्होल्टेज लढत

पारगाव–जारकरवाडी गटात झालेली लढत विशेष चर्चेची ठरली. माजीमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी शिवसेनेचे उमेदवार व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे यांचा २९९२ मतांनी पराभव करत बाजी मारली.

निवडणुकीपूर्वी अरुण गिरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीकडून विवेक वळसे पाटील मैदानात उतरले. शिंदे गटाची शिवसेना, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उबाठा) या तिन्ही पक्षांनी एकत्र येत एकच उमेदवार दिल्याने थेट एकास-एक लढत रंगली.

विवेक वळसे पाटील यांना पराभूत करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पारगाव येथे जाहीर सभा झाली होती. मोठे शक्तीप्रदर्शन झाले, तरीही वळसे पाटील यांनी मतदारांचा विश्वास संपादन करत एकहाती विजय मिळवला. विशेष म्हणजे, माजीमंत्री दिलीप वळसे पाटील प्रचारात सहभागी नव्हते. प्रचाराची धुरा शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांभाळली.

### राजकीय चित्र स्पष्ट

या निकालामुळे आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद पुन्हा अधोरेखित झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे वर्चस्व वाढल्याने आगामी राजकीय समीकरणांवर या निकालाचा परिणाम होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. विवेक वळसे पाटील यांना जिल्हा परिषदेमध्ये महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे.

### पंचायत समितीतही राष्ट्रवादीचे वर्चस्व

पंचायत समितीच्या आठ जागा जिंकत राष्ट्रवादीने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. बोरघर गणात संजय गवारी, शिनोलीत ज्योती पारधी, घोडेगावात कैलासबुवा काळे, पेठमध्ये संजय पवळे, कळंबमध्ये उषा कानडे, जारकरवाडीत अंकिता वाळुंज, पिंपळगाव तर्फे महाळुंगे येथे शिवाजी निघोट आणि अवसरी बुद्रुक येथे निलेश टेमकर यांनी विजय मिळवला.काही गणांमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षालाही यश मिळाले. चांडोली बुद्रुक येथे प्रियंका वाघ तर पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक येथे श्वेता ढोबळे विजयी झाल्या.

# २४वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२६ची घोषणा




**(समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाऊस 'झी'ने देशाच्या मनोरंजन विश्वाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून, कथाकथनाच्या आणि त्या अनुभवण्याच्या पद्धतींना सातत्याने नवे रूप दिले आहे. संस्कृतीत रुजलेल्या आणि भविष्यासाठी सज्ज अशा भावनिकदृष्ट्या प्रभावी कथाकथनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, विभिन्न स्क्रीन्स, स्वरूपे आणि भाषांमधून समृद्ध व अनुभवात्मक मनोरंजन घडवण्यावर कंपनीचा भर आहे. अनेक दशकांच्या कथाकथनाच्या अनुभवाच्या जोरावर हे नेटवर्क विविध प्लॅटफॉर्म्सवर प्रेक्षकांशी असलेला संवाद सातत्याने अधिक विकसित करत असून प्रेक्षकांशी अधिक खोल आणि अर्थपूर्ण नाते निर्माण करत आहे.

या परंपरेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून झी सिने अ‍ॅवॉर्डसचा यात समावेश होतो, जो हिंदी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्टतेचा गौरव करणारे विश्वासार्ह आणि मानाचे व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. वर्षानुवर्षे हा सोहळा केवळ उद्योगातील यशाचेच नव्हे, तर चित्रपट आणि प्रेक्षकांमधील दृढ नात्याचेही प्रतिबिंब ठरला असून, सिनेमाचे खरे शिलेदार म्हणून चाहत्यांना मान्यता देणारा हा एक अत्यंत लोकप्रिय उत्सव बनला आहे. यावर्षी 'झी' आपली प्रेक्षकांना प्रथम ठेवणारी 'फॅन्टर्टेनमेंट' ही संकल्पना 'यह पल है फॅन्स का' या पुढील टप्प्यासह एका नवीन उंचीवर घेऊन जात आहे. चाहत्यांच्या प्रेम, निष्ठा आणि उत्कटतेतूनच सिनेमातील सर्वांत अविस्मरणीय क्षण घडतात या विश्वासाला ही संकल्पना अधिक बळ देते. मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026 या सत्याचा उत्सव साजरा करत, कलाकार आणि त्यांच्या सर्वांत मोठ्या चाहत्यांमध्ये प्रत्येक क्षण सामायिक अनुभव बनवत आहेत.

## पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विस्तार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

दिल्लीतील साउथहॅम्प्टन विद्यापीठाने एक नवीन एक वर्षाचा एमएससी (डेटा सायन्स) कार्यक्रम सुरू केला आहे, ज्याचा उद्देश वास्तविक-जगातील, मानव-केंद्रित आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रगत विश्लेषणात्मक, संगणकीय आणि संशोधन कौशल्ये विकसित करणे आहे. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ मध्ये जगातील शीर्ष १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेल्या या विद्यापीठाने, त्याच्या जागतिक शैक्षणिक अनुभवासह, उद्योग, सरकार आणि शैक्षणिक क्षेत्रात सिद्धांत जबाबदारीने आणि प्रभावीपणे लागू करू शकणाऱ्या डेटा शास्त्रज्ञांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी हा कार्यक्रम सुरू केला आहे. डेटा सायन्समधील हा एक वर्षाचा एमएससी प्रोग्राम आजच्या डेटा-चालित अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार तयार केलेला अनुप्रयोग-आधारित शिक्षण अनुभव देतो.

# जिल्हा परिषद निवडणुकीतही देवेंद्र - रविंद्र

**(समर्थ गांवकरी)**

राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. 1 असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.



देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि रविंद्र चव्हाण यांच्या नियोजनाच्या बळावर भारतीय जनता पक्षाने राज्यात सर्वाधिक जागा मिळविण्याची अनोखी हॅटट्रिक प्राप्त केली आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या नगर परिषद निवडणूका, त्यानंतर जानेवारीत झालेल्या महानगरपालिका निवडणुका आणि या फेब्रुवारी महिन्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत देवेंद्र आणि रविंद्र या राजकीय पॉवरफुल जोडीने अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचार यंत्रणा पद्धती, स्थानिक पातळीवरील पक्षासोबत राज्य पातळीवरील पक्षाचा थेट संवाद आणि समन्वय अशा विविध माध्यमातून भाजपाला उच्च दर्जाची सक्षम पक्ष यंत्रणा उभारली. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेतृत्वाचा वरदहस्त लाभला आणि धाकही जाणवला. याचा सकारात्मक परिणाम होऊन पक्षाने अनेक ठिकाणी अत्यंत आश्चर्यकारक आणि धक्कादायक विजय नोंदवले. या यशाचे मुख्य शिल्पकार देवेंद्र फडणवीस तर सूत्रधार रविंद्र चव्हाण हे आहेत हे निर्विवादपणे म्हणावे लागेल. रविंद्र चव्हाण यांना निवडणूक सिद्ध नेता म्हणून ओळखले जाते. ते जमिनीवर वावरणारे आणि कार्यकर्त्यात रमणारे प्रदेशाध्यक्ष आहेत. निवडणुकीत अत्यावश्यक असणारे साम दाम दंड भेद वापरताना विचारधारेच्या धाग्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना जोडणारे असे त्यांचे नेतृत्त्व आहे म्हणूनच दिल्ली आणि नागपूर दोन्ही सत्ताकेंद्रांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्याच बरोबर त्यांना देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा आणि सहकार्य कायम मिळतच असते.

# जागतिक कर्करोग दिनी आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलकडून 'राइड फॉर लाइफ'द्वारे जनजागृतीचा उपक्रम

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या सर्वसमावेशक कर्करोग देखभाल मंच 'ऑन्को+ द सेंटर ऑफ ऑन्कोलॉजी एक्सलन्स' तर्फे पुण्यात 'राइड फॉर लाइफ' कर्करोग जनजागृती बाइक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून कर्करोगाविषयी जागरूकता वाढवणे, प्रतिबंधाला प्रोत्साहन देणे आणि आजाराचे लवकर निदान करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सकाळी ९.३० वाजता सुरू झालेल्या या रॅलीत डॉक्टर, आरोग्यसेवक तसेच हॉस्पिटलमधील १५० हून अधिक कर्मचारी सहभागी झाले होते. "युनायटेड बाय युनिक" या संकल्पनेअंतर्गत आयोजित या रॅलीत कर्करोगाचा प्रत्येक प्रवास वेगळा असला, तरी या



आजाराविषयी जनजागृतीची जबाबदारी सर्वांचीच आहे, हा संदेश देण्यात आला. कर्करोगाविषयीची चर्चा हॉस्पिटलच्या चौकटीबाहेर समाजापर्यंत पोहोचवणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. या उपक्रमाबाबत आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पामेश गुप्ता म्हणाले, "कर्करोगावरील उपचारांपूर्वी जागरूकता, प्रतिबंध आणि वेळेवर तपासणी या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. समाजात ज्ञान आणि सहभाग असेल, तर सकारात्मक आणि दीर्घकालीन बदल घडवता येतात. 'राइड फॉर लाइफ' या रॅलीच्या माध्यमातून आम्ही हाच संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ऑन्को+ अंतर्गत आम्ही उपचारांपलीकडे जाऊन प्रतिबंधावर आधारित कर्करोग देखभाल अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध आहोत." ऑन्को+ च्या माध्यमातून आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये एकात्मिक व सर्वांगीण कर्करोग देखभाल सेवा पुरवली जाते. तज्ज्ञ ऑन्कोलॉजिस्ट्स, प्रगत निदान प्रणाली आणि मल्टिडिसिप्लिनरी उपचार पद्धती यांचा समन्वय साधत लवकर निदान आणि प्रतिबंधावर विशेष भर देण्यात येतो. सातत्यपूर्ण जनजागृती आणि वेळेवर हस्तक्षेपातून कर्करोगाचे ओझे कमी करण्याचे दीर्घकालीन ध्येय या मंचातून प्रतिबिंबित होते. 'राइड फॉर लाइफ' बाइक रॅली ही कर्करोगाबाबत जागरूक समाज घडवण्याच्या दिशेने हॉस्पिटलने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल असून, जागरूकतेतून कृती आणि लवकर निदानातून चांगले उपचार परिणाम साध्य करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. जागतिक कर्करोग दिनानिमित्त आयोजित या रॅलीद्वारे आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात जागरूकता, प्रतिबंधात्मक उपाय आणि आशेचा निर्धार अधिक दृढ केला आहे.

## विजयाचा गुलाल अन् डोळ्यांत पाणी

**लोणावळा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेच्या मावळ तालुक्यातील पाच गट आणि पंचायत समितीच्या दहा जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या निकालात राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व राखले. पण, यावेळी एकीकडे विजयाचा गुलाल उधळला जात असताना विजयी उमेदवार आणि कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत अजित पवार यांच्या आठवणींनी पाणी आले. काहींचा आवाजही जड झाला होता. वडगाव येथील नवीन तहसील कार्यालयात सोमवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास मतमोजणीस सुरुवात झाली. निकाल ऐकण्यासाठी सकाळपासूनच मतमोजणी केंद्राबाहेर पंचायत समितीच्या आवारात उमेदवारांच्या समर्थक व राजकीय पक्षांच्या तालुक्यातून आलेल्या कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राबाहेर मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# मोबाईल शॉपीतील वादातून दोन गटात राडा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहराच्या स्टेशन रोड परिसरात असलेल्या एका मोबाईल शॉपीमध्ये मोबाईल खरेदीच्या व्यवहारातून वाद निर्माण होऊन त्याचे रूपांतर विनयभंग व हाणामारीत झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली आहे.

या प्रकरणात परस्पर विरोधी फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलीस दोन्ही बाजूंनी तपास करत आहेत. या घटनेत २० वर्षीय युवतीने मोबाईल शॉपीतील व्यक्तीवर विनयभंग व जातीवाचक शिवीगाळ केल्याचा गंभीर आरोप केला आहे. तर दुसरीकडे, संबंधित दुकानदाराने युवती व तिच्या नातेवाईकांकडून मारहाण व दुकानाची तोडफोड केल्याची फिर्याद दाखल केली आहे.

युवतीने मोबाईल शॉपीमधून जुना मोबाईल खरेदी केला होता. मोबाईलमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने आणि खाते सुरू होत नसल्याने ती रात्रीच्या सुमारास पुन्हा दुकानात गेली.

यावेळी दुकानाच्या गल्ल्यावर बसलेला संजूर मल्लुद्दीन आलम शेख (वय-४४, रा. रेल्वे स्टेशन परिसर) याने तिच्याकडे मोबाईल क्रमांकाची मागणी केली. युवतीने नकार दिला असता त्याने वाईट हेतूने तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. तसेच पीडितेच्या जातीचा उल्लेख करत अश्लील व जातीवाचक शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी शेख विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

दरम्यान, याच घटनेत दुसरी बाजू म्हणून मोबाईल दुकानदार संजूर मलुद्दीन आलम शेख यांनीही कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, ६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी एका युवतीने त्यांच्याकडून २ हजार २०० रुपयांना जुना मोबाईल खरेदी केला. मात्र, संपूर्ण पैसे न देता ती निघून गेली. काही वेळाने ती परत येऊन पैशांवरून वाद घालू लागली. वाद वाढल्यानंतर युवतीने आपल्या नातेवाईकांना बोलावून घेतले. नातेवाईकांनी संजूर शेख यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच दुकानातील काचेचा काउंटर व विक्रीसाठी ठेवलेले मोबाईल फोडून मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

आरडाओरड झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप केला. दुकानदाराच्या फिर्यादीवरून संबंधित संशयित आरोपींविरुद्ध मारहाण, बेकायदेशीर प्रवेश व नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## क्वालकॉम जागतिक इंजिनियरिंग कार्यप्रणालीत भारताची महत्त्वाची भूमिका

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

क्वालकॉम टेक्नॉलॉजीज इंक ने आज आपल्या २ एनएम सेमीकंडक्टर डिझाईनच्या यशस्वी टेप-आउटची घोषणा केली. प्रगत सेमीकंडक्टर डिझाईन क्षेत्रातील ही एक महत्त्वाची घडामोड असून ती भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या सेमीकंडक्टर ईकोसिस्टमला पाठबळ देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेस बळकटी देते. ही सिद्धी बंगळूर, चेन्नई आणि हैदराबादेतील इंजिनियरिंग विकास केंद्रांच्या साथीने क्वालकॉमच्या जागतिक इंजिनियरिंग क्षमतांची ताकद दर्शविते. ही केंद्रे जागतिक स्तरावर कंपनीच्या सर्वात प्रगत आणि कुशल विकास केंद्रांपैकी आहेत, तसेच अमेरिकेच्या बाहेरील, कंपनीचा सर्वात मोठा इंजिनियर्सचा कर्मचारीवर्ग येथे कार्यरत आहे. हा टप्पा अत्याधुनिक सेमीकंडक्टर विकासासाठीचे महत्त्वपूर्ण केंद्र



म्हणून भारताचा उदय झाल्याचे अधोरेखित करतो आणि देशाच्या सेमीकंडक्टर क्षेत्राच्या उभारणीत आणि प्रगतीत क्वालकॉमची दीर्घकालीन गुंतवणूक दशवितो. केंद्रीय रेल्वे; माहिती आणि प्रसारण; व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांच्या भेटीदरम्यान क्वालकॉमच्या बंगळूर सुविधेत ही सिद्धी सादर करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे जागतिक सेमीकंडक्टर इनोव्हेशनमध्ये भारताचे वाढते महत्त्व आणि ही प्रगती पुढे नेण्यात क्वालकॉमची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित झाली.

# पाच अनोख्या प्रसिध्द व्यक्तींच्या निवासस्थानाच्या दौऱ्यासह पुनरागमन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारताची आघाडीची पेंट व सजावट कंपनी एशियन पेन्ट्स आपल्या बहुचर्चित होम डेकोर व स्टोरीटेलिंग उपक्रम 'एशियन पेन्ट्स व्हेअर द हार्ट इज' चा नववा सीझन घेऊन परतली आहे. गेल्या अनेक वर्षांत ही मालिका केवळ घरांच्या सजावटीपुरती मर्यादित न राहता, त्या घरात राहणाऱ्या व्यक्तींच्या भावना, आठवणी आणि जीवनमूल्यांचे प्रतिबिंब म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. सीझन ९ हीच परंपरा पुढे नेत, भिंती व रंगांपलीकडील कथा उलगडतो—जिथे भावना, आठवणी आणि मूल्ये घराला खऱ्या अर्थाने 'घर' बनवतात. या सीझनमध्ये भारतातील काही सर्वाधिक लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांची पाच वेगवेगळी घरे प्रेक्षकांसमोर उघडली जातील ज्यामध्ये आहेत




सोनाक्षी सिन्हा व झहीर इक्बाल, गौतम गंभीर, कीर्ती सुरेश व अँटोनी थट्टिल, अर्चना पूरन सिंग व परमीत सेठी, तसेच अमन व प्रिया गुप्ता.प्रत्येकाचे निवासस्थान शैली, भौगोलिक स्थान आणि व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत वेगळे असले तरी, त्या सर्वांमध्ये उबदारपणा, प्रामाणिकपणा आणि एक सशक्त भावनिक संबंध समान आहे. या संपूर्ण सीझनमध्ये घरं ही नात्यांनी, दैनंदिन सवयींनी, आठवणींनी आणि जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांनी घडलेली जिवंत कॅनव्हास कशी बनतात, हे दाखवण्यात येते. प्रेक्षकांना अशा घरांमध्ये प्रवेश मिळतो, जी खऱ्या अर्थाने 'जगलेली' वाटतात. अर्चना आणि परमीत त्यांचे मढ येथील अँग्लो-स्पॅनिश शैलीतील घर दाखवतात जे निसर्ग, कुटुंब आणि सामायिक आठवणींमध्ये हळूहळू विकसित झाले आहे.कीर्ती आणि अँटोनी यांचे रंगीबेरंगी कोची येथील अपार्टमेंट तिच्या रंगांशी असलेल्या सहज नात्याचे प्रतिबिंब आहे, जिथे आनंदी आणि खेळकर घटक दैनंदिन जीवनासाठी खास जागा निर्माण करतात.तर सोनाक्षी आणि झहीर त्यांच्या 'सादा' नावाच्या पेंटहाऊसचे दरवाजे उघडतात जिथे सनकेन पिटमधील गप्पांपासून ते शांत, आठवणींनी भरलेल्या कोपऱ्यांपर्यंत अनेक भावछटा अनुभवायला मिळतात. गौतमचे शांत, प्रकाशाने भरलेले निवासस्थान त्याच्या सार्वजनिक प्रतिमेशी काहीसे विसंगत आहे; हे स्थान शांत शिस्त आणि निवांत क्षणांसाठी तयार केले आहे, जिथे क्रिकेटच्या स्मृतीचिन्हांसाठी विचारपूर्वक डिझाइन केलेला कोपरा हा यशापेक्षा वारशासाठी एक आदरस्थान ठरतो तर अमन आणि प्रिया यांचे गुरुग्राममधील निवासस्थान अनौपचारिकता, सर्जनशीलता आणि एकत्र वेळ घालवण्यासाठी डिझाइन केले आहे, जिथे मोकळ्या जागांमध्ये मुले मुक्तपणे बागडतात आणि संभाषणे सहजपणे खुलतात. या पाचही घरांमध्ये, परिपूर्णता नव्हे, तर व्यक्तिमत्त्व व्यक्त होते; या जागांना प्रेम, जगलेले क्षण आणि ही घरे खरोखरच तिथे राहणाऱ्या मालकांचीच आहेत हा विश्वास आकार देतात. हा सीझन घरात केवळ सजावटीची निवडीपेक्षा रंग, पोत आणि सजावट हे पैलू कशा प्रकारे भावनिक साधने बनतात हे अधोरेखित करतो. ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेसच्या माध्यमातून, अर्चनाच्या दिवाणखान्यातील 'वॉल ऑफ मेमरीज' आणि कीर्तीच्या शयनगृहातील पारंपरिक वैशिष्ट्ये एशियन पेंट्स निलया आर्क मोतिया चुनखळी फिनिशने अधिक सुंदर बनवली आहेत. गौतमच्या घरात, निलया आर्क मधील नताशाला आवडणारा मॅट पांढरा रंग, क्रिकेटच्या अविस्मरणीय आठवणींसाठी पार्श्वभूमी तयार करतो. दुसरीकडे, सोनाक्षीच्या निवासस्थानी एक अनोखा रॉयल प्ले वॉल-टू-फ्लोर पोत आहे, जो संपूर्ण मजल्यावर पसरलेला आहे.

सीझन ९, रंग हा घराच्या सर्वात वैयक्तिक अभिव्यक्तींपैकी एक कसा बनला आहे हे देखील उघड करतो. या सीझनमधील एक महत्त्वाची नवीन भर म्हणजे 'एशियन पेंट्स वेअर द हार्ट इज' लुकबुक एक विशेष डिझाइन मार्गदर्शक, जो शोमध्ये प्रदर्शित, फिनिशेस, पोत आणि मूड कथा स्पष्ट करतो लुकबुकमुळे दर्शकांना सौंदर्यदृष्टीने अधिक बारकाईने पाहता येते आणि ती स्वतःच्या घरांमध्ये अर्थपूर्णपणे लागू करता येते.